जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक



नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# महानगरपालिकेने अनुदान थकवल्याने शिक्षक तीन महिन्यांपासून पगाराविना

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेने नोव्हेंबर महिन्यापासून शिक्षकांच्या पगारासाठी ५० टक्के अनुदान न दिल्यामुळे ४३ शिक्षक ४ शिक्षकेतर कर्मचारी ११० निवृत्तीवेतनधारक यांचे पगार झालेले नाहीत. अहिल्यानगर महानगरपालिकेच्या शहरात १० मराठी माध्यमाच्या व २ ऊर्दू माध्यमाच्या शाळा आहेत. खाजगी शाळांशी स्पर्धा करत लोकसहभाग मिळवत मनपा शिक्षकांनी या शाळा टिकवून ठेवल्या आहेत. पण मनपा प्रशासन वेळोवेळी शिक्षकांच्या दरमहा पगाराकडे दुर्लक्ष करत आहेत. याबाबत अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्तांना महाराष्ट्र राज्य नगरपालिका, महानगरपालिका, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सेवा संघाच्यावतीने निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, शिक्षकांचा सातवा वेतन आयोग फरक ७६ लाख ६१ हजार ९८४ रुपये, पाच वर्षांपासूनची मेडिकल बीले ५ लाख ८४ हजार ५५८ रुपये, शिक्षकांच्या पगारा साठीचे ५० टक्के अनुदान (महानगरपालिका हिस्सा) नोव्हेंबर २०२४ ते मार्च २०२५ पर्यंतचे १ कोटी ६९ लाख ६६ हजार ४३६ रुपये अशी एकूण २ कोटी ५२ लाख १२ हजार ९७८ रुपये महानगरपालिकेने थकवले आहेत.

बहुतांशी शिक्षकांनी अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेचे व राष्ट्रीयीकृत बँकांचे गृहकर्ज घेतलेले आहेत. वेळेवर हप्ता भरला जात नसल्यामुळे शिक्षकांकडून चक्रवाढ व्याज आकारले जात आहे. तसेच वेळेवर कर्जाचा हप्ता जात नसल्यामुळे शिक्षकांचे सिबिल खराब झालेले आहे. त्यामुळे शिक्षकांना कोणाकडूनही कर्ज मिळत नाही. उसनवारी करुन शिक्षकांना कुटुंब चालवावे लागते आहे. बहुतांशी निवृत्तीवेतनधारक शिक्षक/शिक्षिका वयोवृद्ध आहेत त्यामुळे त्यांना निवृत्तीवेतन वेळेवर मिळत नसल्याने औषधोपचारासाठी उसनवारी करावी लागेल. या सर्व कारणांमुळे महापालिका शिक्षक आर्थिक विवंचनेत सापडली आहे. महानगरपालिकेत वेतनासाठी वेळोवेळी चकरा मारुनही काही उपयोग होत नाही. वारंवार वेगवेगळी कारणे पुढे करून वेतन अनुदान देण्यासाठी टाळाटाळ केली जाते. विशेष म्हणजे आर्थिक वर्ष २०२४–२५ चे शिक्षण विभागाचे बजेट पाच कोटी होते, त्यातील अडीच कोटी रक्कम महानगरपालिकेने अद्याप शिक्षण विभागाला दिलेली नाही.

गेल्या १५ वर्षात महानगरपालिका शाळांमधील एकही शिक्षक अतिरिक्त झालेला नाही. कित्येक शिक्षक समायोजनाने व बदली करून महापालिकेत आले आहेत. हे फक्त महापालिका शाळांतील शिक्षकांमुळेच झाले आहे. शिक्षकांच्या प्रामाणिक कामाची ही पावती आहे. भौतिक सुविधांचा अभाव असताना लोकसहभागातून तसेच शिक्षकांच्या वैयक्तिक खर्चातून महापालिका शाळा टिकून आहेत. परंतु असे असताना शिक्षकांना कायम पगाराविना रहावे लागते. आता तीन महिने पगार झालेला नाही, हे अत्यंत दुर्दैवी आहे. पगार तर नाहीच पण यासोबतच महापालिका शिक्षकांना कोणतीही पेन्शन योजना लागू नाही, मेडिकल बिले मिळत नाही, सातव्या वेतन आयोगाचा हिस्सा नाही, वेतन नसल्यामुळे कर्ज मिळत नाही आणि ज्यांनी कर्ज काढले त्यांचे सिबिल खराब झालेले आहेत. सर्व शिक्षक हे आर्थिक विवंचनेत सापडले असून त्यांचे पुढील भविष्य अंधारलेले व असुरक्षित असल्याची भावना मनात निर्माण झाली आहे.

अत्यल्प भौतिक सुविधा असतानाही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलांना ज्ञानदानाचे पवित्र काम महानगरपालिकेतील प्रत्येक शिक्षक प्रामाणिकपणे करत आहे, तरीही वेतनासाठी मनपाकडे विनवण्या कराव्या लागत आहेत. वास्तविक पाहता शिक्षण विभागसुद्धा मनपा प्रशासनाचाच एक अविभाज्य घटक असूनसुद्धा फक्त शिक्षण विभागाचाच वेतनाचा प्रश्न नेहमीच प्रलंबित राहत आला आहे.

मनपाची जर तशी आर्थिक परिस्थिती नसेल तर तसे राज्य शासनाला लेखी कळवून शिक्षण विभागाचे १००% वेतन राज्य शासनाने देण्याचे नियोजन करण्याबाबत प्रस्ताव द्यावा. सलग २–३ महिने वेतन थकीत होत आलेले आहे. शिक्षकांचेही कुटुंब आहे, जबाबदाऱ्या आहेत, त्यामुळे आता तरी त्यांच्या मानसिक स्वास्थ्याचा विचार करावा.

नियमित वेतन होण्यासाठी, मागील थकीत अनुदान तात्काळ मिळावे, शाळा टिकवण्याच्या, वाढवण्याच्या दृष्टीने आर्थिक मदत करावी ही महापालिकेकडून अपेक्षा. प्रत्येक वेळी आंदोलन करून जर वेतन मिळवावे लागत असेल तर हे अत्यंत चुकीचे आहे. प्रत्येक वेळी आर्थिक परिस्थिती नाजूक असल्याचे सांगितले जाते अन् त्याचा फटका फक्त शिक्षण विभागाला बसतो. त्यापेक्षा सदर शाळा व शिक्षक जिल्हा परिषदेकडे वर्ग करावे किंवा शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन शालेय शिक्षण विभागाकडून शंभर टक्के करण्याचा प्रस्ताव महापालिकेने नगरविकास विभागामार्फत राज्य शासनास द्यावा, असे मनपा शिक्षक संघाच्या अध्यक्ष सौ.मनिषा शिंदे म्हणाल्या.

## प्रेरणादायी अक्षरधन...



"मुसाफिर"–९८२२०२०६९१

### गर्जा महाराष्ट्र माझा... १ मे

आपणा सर्वांना १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

या शुभदिनी राजकीय, प्रशासकीय कार्यक्रम होतील. आपण मऱ्हाटमोळे या महाराष्ट्र दिनाचा अभिमान बाळगत गोडवे, पोवाडे गाऊ.

महाराष्ट्राचा मंगलकलश आणल्यापासून आजपर्यंत महाराष्ट्राने नेत्रदीपक प्रगती केली आहे. औद्योगिकरण, पायाभूत सेवासुविधा, गुंतवणूक, साहित्य–कला–क्रीडा इ. विविध क्षेत्रात महाराष्ट्राची कामगिरी सर्वोत्तम होत आहे. इतर बहुसंख्य राज्यांच्या तुलनेत आपला राज्य निश्चितच 'महा'राष्ट्र आहे.

१ मे हा आंतरराष्ट्रीय कामगार दिन सुद्धा आहे. महाराष्ट्र स्थापनेनंतरचा कामगारवर्ग आतून–बाहेरून खूप बदललेला आहे. गिरणी कामगार लुप्त झाला हळूहळू. आजचा कामगारवर्ग दुर्दैवाने संघटित राहिलेला आहे. शेतकरी कामगार, राजकीय वजनदार, भांडवलदार, नवसरंजामदार व उच्चभ्रू मध्यमवर्गाच्या हाती गेले आहेत.

संयुक्त महाराष्ट्र स्थापनेत शेतकरी, कामगार, मध्यमवर्ग प्रभावी होता. नंतर दलित, आदिवासी, भटके विमुक्त इ.चा प्रवेश व प्रभाव वाढला. नव्वदीनंतर हे बदलले. सध्या उद्योगात नवभांडवलदार, शेती क्षेत्रात नवीन सरंजामदारी वाढली. (प्रचंड पाण्याचा वापर असलेली ऊस कारखानदारी व शिक्षण संस्था ठराविक घराण्यांतच आहे)

आजच्या महाराष्ट्राच्या राजकीय परिस्थितीवर एक नागरिक म्हणून सगळ्यांनी विचार करण्याची वेळ आली आहे. नीतिमत्ता राहिलीच नसून केवळ स्वार्थ सत्तापिपासू वृत्ती वाढल्यात. एकीकडे उच्चभ्रू मध्यमवर्गीय वाढत असले तरी खेड्यातल्या शेतकरी, मजदूरांची अवस्था दयनीय आहे. सत्तेसाठी फुकटची प्रलोभने बंद करून गुंतवणूक, उर्जा, पाणी, सहकार इ. क्षेत्रात शाश्वत विकासच उद्याचा महाराष्ट्र उभा करू शकेल. या आशेवरच महाराष्ट्र दिनाच्या पुनश्च शुभेच्छा.

**– किशोर गांधी**

## मुळा धरण क्षेत्रातील लाखो रुपयांची वृक्ष गेली कुठे?, खुलासा न मिळाल्यास 'जवाब दो आंदोलना'चा इशारा

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील मुळा पाटबंधारे विभाग अंतर्गत २०२०–२०२१, २०२१–२०२२, २०२२–२०२३, २०२३–२०२४ तसेच २०२४–२०२५ या सालांतर्गत दरवर्षी मुळा धरण परिसरात १७ ते २० लाख रुपयाची वृक्षारोपण करण्यात आलेली आहे. त्या संदर्भात टेंडरही काढण्यात आले असे निदर्शनास आले आहे. परंतु वास्तविक पाहता सदर ठिकाणी प्रत्यक्षात पाहणी केली असता कुठल्याही प्रकारची झाडे दिसत नसल्याने वृक्ष लागवडीत मोठा गैरकारभार झाल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आला आहे. मुळा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अधिक अभियंता यांना निवेदन देऊन या संदर्भातील खुलासा करण्याची मागणी केली आहे. खुलासा न मिळाल्यास जवाब दो आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.



मुळा धरण क्षेत्रात वृक्ष लागवडीत मोठा गैरकारभार झाल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आला आहे.

यावेळी जिल्हाध्यक्ष योगेश साठे, युवा शहर अध्यक्ष ॲड.योगेश गुंजाळ, जिल्हा सल्लागार जे. डी. शिरसाठ, शहर उपाध्यक्ष गणेश राऊत आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाराष्ट्र स्थापन दिनानिमित्त १ मे रोजी सकाळी ८ वाजता मुख्य शासकीय ध्वजारोहण

नगर – महाराष्ट्र राज्याच्या ६६ व्या स्थापना दिनानिमित्त १ मे रोजी सकाळी ८ वाजता मुख्य शासकीय ध्वजारोहण राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर होणार आहे.

ध्वजारोहणाच्या कार्यक्रमास सर्वांनी वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

**राष्ट्रध्वजाचा सन्मान राखा**

ध्वजसंहितेतील सर्व नियमांचे व सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. कागदी राष्ट्रध्वजाचा वापर ध्वजसंहितेच्या तरतूदीमध्ये नमूद केल्यानुसारच करावा. ख़राब झालेले माती लागलेले राष्ट्रध्वज गोणी किंवा कपड्यामध्ये व्यवस्थित बांधुन शिऊन बंद करावेत. अशासकीय संस्था, इतर संघटनांनी तसेच नागरिकांनी हे राष्ट्रध्वज तहसिल कार्यालयात सुपूर्द करावेत. राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखावा, असेही कळविण्यात आले आहे.

# पाकिस्तानचा झेंडा पायदळी तुडवून पहलगाम हल्ल्याचा नगरमध्ये निषेध

नगर – महाकाल ग्रुप, हिंदूराष्ट्र सेना, श्रीराम नवमी उत्सव समिती तर्फे पाकिस्तानी अतिरेक्यांनी पहेलगाम येथे केलेल्या भ्याड हल्लाचा निषेध केला. यावेळी चितळे रोड येथे पाकिस्तानचा झेंडा रस्त्यावर चिकटवण्यात आला. तसेच पाकिस्तानी झेंडा पायदळी तुडवून पाकिस्तान मुर्दाबाद... पाकिस्तान मुर्दाबाद....अशा घोषणा देत इस्लामी दहशतवादाचा निषेध करण्यात आला. याप्रसंगी सुमित धेंड, सचिन पळशीकर, विशाल बोल्ली, प्रतीक बोगावत, गणेश झिंजे, रवी दंडी, शशिकांत देशमुख, अतुल चित्तरंजन, स्वामी बिडकर, परेश खराडे, विशाल ठाकूर, अक्षय वलाकट्टी, स्वप्नील खोडदे, महेश राऊत, किशोर वडझिरकर, यश सब्बन, यश आडेप, नील दुस्सा, स्वराज बोरा, प्रणव बोज्ञा, तेजस आडेप, श्रेयस धेंड, सोहम धेंड, ब्रिजेश श्रीराम, नानू इगे, प्रथमेश सामल, रुद्राक्षी पळशीकर, हंबल एडके, अभिषेक भालेराव, योगेश ज्ञानपेल्ली आदींसह हिंदुत्ववादी संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते.



पाकिस्तानचा झेंडा पायदळी तुडवून पहेलगाम येथील भ्याड हल्ल्याचा महाकाल ग्रुप तर्फे निषेध करण्यात आला.

धर्मांध जिहादी प्रवृत्तीला भारत सरकारने ठेचून काढावे. निष्पाप पर्यटकांवर गोळीबार करणाऱ्या आतंकवाद्यांना शोधून त्यांना तात्काळ फाशीच शिक्षा द्यावी. अशी मागणी महाकाल ग्रुपच्या वतीने करण्यात आली. यावेळी भारतमाता की जय...., जय श्रीराम अशा घोषणा दिल्या. सुरुवातीला दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या हिंदू बांधवांना श्रद्धांजली वाहण्यात आली.


सुमित धेंड म्हणाले, काश्मीर हा भारताचा अविभाज्य घटक आहे. पहलगाम येथे निष्पाप पर्यटकांवर झालेला हल्ला हा क्रुरता आणि अमानवीय प्रकारचे कृत्य आहे. या घटनेने सर्व भारतीयांच्या मनात चीड निर्माण झाली आहे. आता वेळ आली आहे पाकिस्तानला जशास तसे उत्तर देण्याची. भारत सरकारने इस्लामिक दहशतवादाची पाळीमुळे नष्ट करावे.

प्रतिक बोगावत म्हणाले, धर्मावर केलेले अत्याचार हिंदू कदापि सहन करणार नाही. धर्माची विचारना करून हिंदू पर्यटकांची केलेली हत्या निषेधार्ह आहे. भारत सरकारने अशा इस्लामीक जिहादी प्रवृत्तींना वेळीच आळा घालावा.

सचिन पळशीकर म्हणाले, दूध मांगो तो खीर देंगे! कश्मीर मांगे तो चीर देंगे ! आता वेळ आली आहे इस्लामी दहशतवादाची पाळेमुळे शोधून नष्ट करण्याची व पाकिस्तानला कायमचा धडा शिकवण्याची.

## शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेशाला अक्षय तृतीयानिमित्त ५५५१ आंब्यांचा नैवेद्य

नगर – शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरात अक्षय तृतीयानिमित्त श्री विशाल गणेशाला ५५५१ आंब्यांचा नैवेद्य दाखवून आंब्यांची सजावट करण्यात आली होती. सकाळी अभिषेक करण्यात आला. दुपारी उद्योजक नरेंद्र फिरोदिया, सौ.राखी फिरोदिया यांच्या हस्ते महापुजा करुन आरती करण्यात आली. यावेळी केलास आहुजा उपस्थित होते.



अक्षयतृतीयानिमित्त श्री विशाल गणेशाला ५५५१ आंब्यांचा नैवेद्य दाखवून आंब्यांची सजावट करण्यात आली होती.

याप्रसंगी पुजारी संगमनाथ महाराज, याप्रसंगी देवस्थानचे उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोक कानडे, विश्वस्त प्रा. माणिकराव विधाते, प्रा.नितीन पुंड, गौरव भंडारी, सोहम फिरोदिया, रेखा सारडा, गणेश राऊत, आकाश पटवेकर आदि उपस्थित होते.

यावेळी आशाताई शांतीकुमार फिरोदिया ट्रस्ट व उदयोजक नरेंद्र फिरोदिया यांच्यावतीने हा आंब्याचा प्रसाद देण्यात आला होता

याप्रसंगी अशोक कानडे म्हणाले, 'अक्षय तृतीया साडेतीन मुहूर्तांपैकी एक आहे. याच दिवशी त्रेतायुगाला प्रारंभ झाला. या दिवशी सत्ययुगाचा प्रारंभ झाली. अशी संधी साधलेली असल्यामुळे अक्षय तृतीया या संपूर्ण दिवसाला 'मुहूर्त' म्हणतात. या दिवसाला साडेतीन मुहूर्तांतील एक मुहूर्त मानले जाते. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सातत्याने सुख–समृद्धी प्राप्त करून देणाऱ्या देवतेची कृतज्ञतेचा भाव ठेवून उपासना केल्यास देवतेच्या कृपादृष्टी कायम आपल्यावर राहते. या काळात केलेले दानही सर्वात पवित्र मानले जाते. असेच अक्षयतृतीयानिमित्त आंबा स्वरुपात भाविकांनी दान दिले असल्याचे सांगून भाविकांना दर्शन सुलभ व्हावे, यासाठी सोयी–सुविधा उपलब्ध करुन दिल्या असल्याचे सांगितले.

यावेळी पंडितराव खरपुडे यांनी देवस्थानच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन माणिकराव विधाते यांनी केले. प्रा. नितीन पुंड यांनी आभार मानले.

## कुंतीलाल बोगावत यांचे अल्प आजाराने निधन

नगर – स्टेशन रोडवरील अर्बन बँक कॉलनीतील रहिवासी नगर अर्बन बँकेचे माजी व्यवस्थापक कुंतीलाल झुंबरलाल बोगावत (धामणगाववाला, वय ७७) यांचे ३० एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे सुन, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. साई लिला ट्रॅव्हल्स्चे स्व. मनोज बोगावत यांचे ते वडील होत.

## मधुकर काळे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – पाईपलाईन रोडवरील वाणीनगर मधील रहिवासी मधुकर महादेव काळे (वय ८०) यांचे ३० एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. ते सेवानिवृत्त एस.टी. कर्मचारी होते. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, २ मुली, २ सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार सुधीर पवार यांचे ते व्याही, नितीन व विलास काळे यांचे वडील होत.



मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# जिल्हा क्रीडा निवड समितीतर्फे पुरस्कारांची घोषणा

नगर – जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा क्रीडा पुरस्कार निवड समितीने जिल्हा क्रीडा पुरस्कारांची घोषणा केली आहे. यात सन २०१९–२०, २०२०–२१, २०२१–२२, २०२२–२३, व २०२३–२४ या पाच वर्षाकरिता गुणवंत खेळाडू (पुरुष व महिला) व गुणवंत क्रीडा मार्गदर्शक तसेच सन २०१९–२० करिता गुणवंत क्रीडा कार्यकर्ता/संघटक पुरस्कार्थीची निवड करण्यात आलेली आहे. पुरस्काराचे स्वरुप प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह, रोख रक्कम रुपये १० हजार असे आहे.

सन २०१९–२० च्या जिल्हा क्रीडा पुरस्काराचे मानकरी पुढील प्रमाणे : (एकूण सहा)

**गुणवंत क्रीडा कार्यकर्ता / संघटक पुरस्कार –** दिनेश लक्ष्मण भालेराव, जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत क्रीडा कार्यकर्ता/ संघटक गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार – डेविड सुरेश मकासरे, (पावरलिफ्टिंग) जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणानुक्रमे क्रीडा मार्गदर्शक पुरस्कारार्थी.

**गुणवंत खेळाडू पुरस्कार : (पुरुष प्रवर्ग) –** सोमनाथ अविनाश सपकाळ (बेसबॉल) : जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत खेळाडू पुरस्कारार्थी.

**गुणवंत खेळाडू पुरस्कार : (महिला प्रवर्ग) –** कु. अपुर्वा गोरक्ष गोरे (सायकलिंग) : जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत खेळाडू पुरस्कारार्थी. गुणवंत खेळाडू पुरस्कार : (दिव्यांग प्रवर्ग), सुहास शंकर मोरे (मैदानी): जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत दिव्यांग खेळाडू पुरस्कारार्थी

**गुणवंत खेळाडू पुरस्कार : (थेट पुरस्कार) –** कु. फिजा फत्तू सय्यद (सॉफ्टबॉल) जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत पुरस्कारार्थी.

सन २०२०–२१ च्या जिल्हा क्रीडा पुरस्काराचे मानकरी पुढील प्रमाणे : (एकूण तीन)

**गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार :** प्रा. डॉ. विजय लक्ष्मण म्हस्के (व्हॉलीबॉल) जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणानुक्रमे क्रीडा मार्गदर्शक पुरस्कारार्थी.

**गुणवंत खेळाडू पुरस्कार : (पुरुष प्रवर्ग) –** करण संदीप गहाणडुले (मैदानी) : जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत खेळाडू पुरस्कारार्थी.

**गुणवंत खेळाडू पुरस्कार : (महिला प्रवर्ग)–** कु. वैष्णवी सुनील गोडळकर (तलवारबाजी) : जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत खेळाडू पुरस्कारार्थी.

सन २०२१–२२ च्या जिल्हा क्रीडा पुरस्काराचे मानकरी पुढील प्रमाणे : (एकूण तीन)

**गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार :** प्रा. विजय यशवंत देशमुख (वेटलिफ्टिंग) जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणानुक्रमे क्रीडा मार्गदर्शक पुरस्कारार्थी. गुणवंत खेळाडू पुरस्कार : (पुरुष प्रवर्ग) श्रीनिवास शिवाजी कराळे (मैदानी) : जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत खेळाडू पुरस्कारार्थी.

**गुणवंत खेळाडू पुरस्कार : (महिला प्रवर्ग)–** कु. विश्वेशा विजयसिंह मिस्कीन (मैदानी) : जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत खेळाडू पुरस्कारार्थी.

सन २०२२–२३ च्या जिल्हा क्रीडा पुरस्काराचे मानकरी पुढील प्रमाणे : (एकूण तीन)

**गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार :** श्रीरामसेतू सुधाकर आवारी (मैदानी) जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणानुक्रमे क्रीडा मार्गदर्शक पुरस्कारार्थी.

**गुणवंत खेळाडू पुरस्कार : (पुरुष प्रवर्ग) –** ओम बाबासाहेब करांडे (सायकलिंग) : जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत खेळाडू पुरस्कारार्थी.

**गुणवंत खेळाडू पुरस्कार : (महिला प्रवर्ग) –** कु. कोमल नारायण वाकळे (वेटलिफ्टिंग) : जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत खेळाडू पुरस्कारार्थी.

सन २०२३–२४ च्या जिल्हा क्रीडा पुरस्काराचे मानकरी पुढील प्रमाणे : (एकूण चार)

**गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार :** लक्ष्मण भगवान उदमले (वुशू) जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणानुक्रमे क्रीडा मार्गदर्शक पुरस्कारार्थी.

**गुणवंत खेळाडू पुरस्कार : (पुरुष प्रवर्ग) –** ओंकार मनीष सुरग (तलवारबाजी): जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत खेळाडू पुरस्कारार्थी.

**गुणवंत खेळाडू पुरस्कार : (महिला प्रवर्ग) –** कु. योगिता जगन्नाथ खेडकर (वेटलिफ्टिंग) : जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत खेळाडू पुरस्कारार्थी.

**गुणवंत खेळाडू पुरस्कार :** (विशेष बाब जास्तीचा पुरस्कार)– शंकर भीमराज गदाई (कबड्डी): जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत खेळाडू पुरस्कारार्थींची निवड करण्यात आली आहे.



श्री सद्‌गुरु शंकर महाराजांच्या ७८ व्या समाधी सोहळ्यानिमित्ताने शंकर लीला परिवाराच्या अहिल्यानगर ते धनकवडी पायी पालखी सोहळ्याने शंकर महाराजांच्या जयघोषात धनकवडीकडे प्रस्थान ठेवले.

# भक्तिपूर्ण वातावरणात शंकर लीला परिवाराच्या पायी पालखी सोहळ्याचे धनकवडीकडे प्रस्थान

नगर – श्री सद्‌गुरु शंकर महाराजांच्या ७८ व्या समाधी सोहळ्यानिमित्ताने अहिल्यानगरच्या शंकर लीला परिवाराच्यावतीने अहिल्यानगर ते पुणे धनकवडी पायी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सद्‌गुरु शंकर महाराजांच्या जयघोषात या पायी पालखीने मंगळवारी सायंकाळी दिल्लीगेट येथील श्री स्वामी समर्थ मंदिरातून धनकवडीकडे प्रस्थान ठेवले. या पालखी सोहळ्यात शंकर लीला परिवाराचे अध्यक्ष विजयनाथ केदार बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक भाविक सहभागी झाले आहेत.

ही पायी पालखी अहिल्यानगर, सुपा, शिरूर, रांजणगाव गणपती, कोंढापुरी, वाघोली, चंदननगर, हडपसर बायपास मार्गे श्री सद्‌रूरु शंकर महाराज मठ धनकवडी पुणे येथील श्री सद्‌गुरु शंकर महाराजांच्या मठात ५ मे रोजी पोहोचणार आहे. पालखीच्या मार्गातील विविध गावांमध्ये पालखीचे स्वागत करण्यात येत आहे. ज्या शंकर महाराजांच्या भक्तांना पायी दिंडी सोहळ्यामध्ये सहभागी होता आले नाही त्यांनी ५ मे रोजी आपल्या घरी शंकर गीता पारायण करावे, असे आवाहन विजयनाथ केदार बाबा यांनी केले आहे.

पालखी प्रस्थान सोहळ्यास आकाश भोसले, चंद्रकांत पंडित, विभव निसळगंड, श्रीपाद तांबोळी, गजेंद्र अकुर, संदीप नगरकर, नीलिमा केदारी, सौ. गांधी, सुरेखा भालेराव, कलावंत राजू गटणे, श्री. बडवे, श्री. इंदापूरकर, प्रमोद वाळके आदींसह भाविक उपस्थित होते.

# चंदुकाका ज्वेलर्स या सुवर्णपेढीत अक्षय्यतृतीयेनिमित्त विशेष ऑफर



अमीत कोठारी

नगर – ग्राहक छोटा असो वा मोठा १ ग्रॅमची वेढणी घेणारा असो किंवा ३ तोळ्याहून अधिक आकर्षक नेकलेस घेणारी महिला असो. सुवर्ण खरेदीचा क्षण हा प्रत्येकासाठी आनंददायी असतो व तो अधिक आनंदमय करण्याच्या उद्देशाने चंदुकाका ज्वेलर्स आपल्यासाठी घेवून आले आहे अक्षय्यतृतीयेनिमित्त खास विशेष ऑफर. या अंतर्गत आपणांस २२ कॅरेट सोन्याच्या दागिन्यांच्या किंमतीत प्रती ग्रॅम रूपये २५१ सूट मिळणार आहे. ही ऑफर फक्त तीन दिवस म्हणजेच २८ एप्रिल ते १ मे पर्यंतच चंदुकाका ज्वेलर्सच्या अहिल्यानगर, श्रीरामपुर, कडा या तिनही शोरूममध्ये चालु असल्याने याचा लाभ घेण्याचे आवाहन व्यवस्थापकांनी केले आहे.

सुवर्णयोजने अंतर्गत आपणांस १५०% पर्यंत बोनस मिळणार असुन सोन्यांचे दागिने खरेदी करतांना देखील अधिक फायदा मिळणार आहे.

नवीनच सुरू केलेल्या डिजी गोल्ड अंतर्गत आपली सुवर्णखरेदी आपल्या हातात या अंतर्गत आपण या ॲपव्दारे घरबसल्या सुवर्णखरेदीचा लाभ घेवू शकतात.

ज्वेलर्स नेहमीच ग्राहकांच्या दृष्टीने अनेक आकर्षक योजना घेवून येत असतो. प्रत्येक ग्राहक हा आमच्यासाठी विर्शेष असतो. तो आमच्याकडील दागिने, आकर्षक लेटेस्ट डिझाईन व सेवेच्या माध्यमातुन समाधानी होईल याकडे आमचे विशेष लक्ष असते. येथे आपणांस आकर्षक डिझाईन व आपल्या आवडी निवडीला साजेशा अलंकारांची भव्य श्रृंखला आपणांस पहावयास मिळणार आहे. यामध्ये शाहीहार, राणीहार, बाजुबंद, टेम्पल ज्वेलरी, गंठण, चोकर, ठुशी, नेकलेस, पाटल्या, बांगड्या, ब्रासलेट अशा असंख्य दागिन्यांच्या व्हरायटी येथे उपलब्ध करून देण्यात आली आहे असे व्यवस्थापकांनी सांगितले. तसेच आमच्या येथे खरेदी केलेल्या सोन्याच्या दागिन्यांची मोडतेवेळी कोणतीही घट धरली जात नाही. याचा लाभ घ्यावा असे आवाहन संचालक अमित कोठारी यांनी केले आहे.

# ज्या क्षेत्रात जाता, त्या क्षेत्रात सर्वोत्कृष्ट द्या

## गणेश भोसले यांचे प्रतिपादन; शासकीय तंत्रनिकेतन, अहिल्यानगरमध्ये अत्याधुनिक सीईटी संगणक प्रयोगशाळेचे उद्‌घाटन



शासकीय तंत्रनिकेतनमध्ये अत्याधुनिक सीईटी संगणक प्रयोगशाळेचे उद्‌घाटन करण्यात आले.

नगर – ज्या क्षेत्रात जाता, त्या क्षेत्रात सर्वोत्कृष्ट द्या. अद्ययावत प्रयोगशाळेचा पूर्ण क्षमतेने वापर करून आपले भविष्य उज्वल करण्याची ही एक संधी विद्यार्थ्यांना मिळाली आहे. या महाविद्यालयात आमदार संग्राम जगताप यांच्या निधीतून अद्यावत ग्रंथालय उभे करण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे, असे प्रतिपादन गणेश भोसले यांनी केले.

विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल प्राचार्य डॉ. अजय आगरकर यांचे अभिनंदन केले. पदविका तंत्रशिक्षणात अव्वल असलेल्या या संस्थेने पुढाकार घेऊन शहरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव तयार करून शासनास सादर करावे. ते मंजूरीसाठी पाठपुरावा केला जाणार आहे. यामुळे गोर–गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची सोय जिल्ह्यातच शक्य होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शासकीय तंत्रनिकेतन अहिल्यानगर या संस्थेत अद्ययावत तंत्रज्ञानाने युक्त सीईटी संगणक प्रयोगशाळेचे उद्‌घाटन माजी उपमहापौर गणेश भोसले यांच्या हस्ते झाले. माध्यमिकचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे प्राचार्य डॉ. अजय आगरकर, श्री उपकरणीकरण विभागप्रमुख बाळासाहेब कर्डिले, संगणक विभागप्रमुख सुधीर मुळे, अणुविद्युत विभागप्रमुख ज्ञानेश्वर अहिरराव, विद्युत विभागप्रमुख डॉ. बाबासाहेब खरबस, प्रबंधक मनोहर चौधरी, प्रयोगशाळेचे समन्वयक संजय हरिप यांच्यासह सर्व अधिकारी कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

अशोक कडूस म्हणाले की, शासकीय तंत्रनिकेतन ही संस्था तंत्रशिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी करीत असून, या लॅबच्या उपलब्धतेमुळे संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे, असे गौरवोद्‌गार काढले. तसेच या संस्थेने या वर्षी ३१५ विद्यार्थ्यांना नामांकित औद्यागिक कंपन्यांमध्ये प्लेसमेंट मिळवून दिले. अद्ययावत प्रयोगशाळा आणि संस्थेत उपलब्ध इतर संसाधनांचा वापर करून विद्यार्थ्यांनी आपले उज्वल भविष्य घडविण्याचे त्यांनी आवाहन केले. तर विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीकोनाने विविध उपक्रम राबविणारे प्राचार्य डॉ.अजय आगरकर आणि अधिकाऱ्यांचे कौतुक केले.

दोन हजार चौरस फुटामध्ये शंभर संगणकांचा सम ावेश असलेली वातानुकूलित सीईटी संगणक प्रयोगशाळा आहे. यामध्ये १०० आय सेव्हन संगणक असून, सीईटी परीक्षेसाठी आवश्यक सर्व यंत्रणा आहेत. सर्व्हर रूम, यूपीएस प्रणाली, विद्युत जनरेटर आदी सुविधा आहेत. प्रामुख्याने याचा उपयोग सीईटी परीक्षेस बसणाऱ्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांकरिता वापरण्यात येणार असून, यासाठी एकूण सव्वा कोटी रुपये खर्च आला आहे. सदर खर्च सीईटी सेल, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्यातर्फे करण्यात आला आहे. ही यंत्रणा उभी करणारी कंपनी तीन वर्ष पूर्ण देखभाल करणार असल्याची माहिती प्रयोगशाळेचे समन्वयक संजय हरिप यांनी दिली.

प्रास्ताविकात संस्थेचे प्राचार्य डॉ. अजय आगरकर यांनी संस्थेतील विद्यार्थ्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा आढावा घेतला. डॉ.आगरकर संस्थेत १ ऑक्टोबर २०२४ रुजू झाले. या सहा महिन्याच्या काळात त्यांनी अनेक विद्यार्थीभिमुख प्रकल्प राबविले. डॉ.अजय आगरकर यांनी संस्थेचा सर्वांगीण विकासाचे ध्येय समोर ठेऊन सात कोटींच्या फेस लिफ्टींग योजने अंतर्गत संस्थेत विकास कामांची आणि नूतनीकरणाची मुहूर्तमेढ रोवली. गेल्या पाच महिन्यात ६५ टक्के कामे पूर्ण केली आहेत. संस्थेत स्कॅनिंग सेंटर उपलब्ध करून घेऊन ऑनलाईन पद्धतीने उत्तरपत्रिका तपासण्याची सुरुवात उन्हाळी २०२५ परीक्षेपासून होणार असल्याची त्यांनी माहिती दिली. संस्थेला नुकतेच इन्कूबेशन हब सेंटर म्हणून मान्यता मिळाली असून नवउद्योजक घडविण्याचे काम सुरू होणार आहे. त्यामुळे राज्यातील निवडक १२ तंत्र शिक्षण संस्थांमध्ये शासकीय तंत्र निकेतन, अहिल्यानगर या संस्थेचा समावेश झाला आहे, ही अभिमानाची बाब असल्याचे सांगितले.

वनविभागाच्या मदतीने संस्थेत दोन एकरांतील विस्तीर्ण जागेत दोन ठिकाणी मियावकी घन जंगलाची मान्यता नुकतीच मिळाली असून, लवकरच शासकीय तंत्रनिकेतन संस्थेचे शैक्षणिक नंदनवनात हिरवळीत रूपांतर होऊ घातले असून, सर्वोत्कृष्ट तंत्रशिक्षण संस्था बनविण्याचा ध्यास आम्ही घेतला आहे, असे मत व्यक्त केले.

संस्थेमध्ये सप्टेंबर आणि ऑक्टोबर २०२४ या काळात राज्यस्तरीय दोन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम घेण्यात आले असून, या वर्षात घेण्याचे प्रस्तावित आहेत, अशी माहिती देत स्टाफ प्रशिक्षण क्षेत्रात सुध्दा उत्तम कामगिरी संस्था करीत आहे. त्याचबरोबर विविध विभागातील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय पेपर प्रेझेंटेशन, प्रोजेक्ट, पोस्टर प्रदर्शनमध्ये उत्कृष्ट सहभाग नोंदविला असून, एकूण पाच ठिकाणी त्यांना प्रथम / द्वितीय पारितोषिक मिळाले असल्याचे प्राचार्यांनी नमूद केले.

केवळ तांत्रिक उपक्रमच नाहीत तर राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सुद्धा शासकीय तंत्र निकेतन संस्थेतील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांनी उत्कृष्ट सहभाग नोंदवित अनेक बक्षीस पटकाविली आहे. यामध्ये मुलींचा बॅडमिंटन संघ (राज्यस्तरीय स्पर्धेतील विजेता, मुलींचा खो–खो संघ (ई१ झोनल स्पर्धेत उपविजेता), मुलांचा बुद्धिबळ संघ (राज्यस्तरीय स्पर्धेत उपविजेता), मुलांचा हॉलीबॉल संघाने (ई १ स्पर्धेत उपविजेता) यश संपादन केले आहे.

एमएसबीटीई आयोजित राज्यस्तरीय प्रोजेक्ट कॉम्पिटिशन २०२४ मध्ये इलेक्ट्रॉनिक विभागातील विद्यार्थ्यांनी रुपये पन्नास हजाराचे प्रथम पारितोषिक मिळविले. जीएमआरटी खोदाद पुणे यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील प्रोजेक्ट कॉम्पिटिशन २०२४ मध्ये इलेक्ट्रॉनिक विभागातील विद्यार्थ्यांनी प्रथम पारितोषिक मिळवले. इलेक्ट्रॉनिक विभागातील ऐश्वर्या गोळे व श्रुती शिंदे या विद्यार्थिनींनी समर्थ पॉलीटेक्निक आयोजित राज्यस्तरीय पेपर प्रेझेंटेशन स्पर्धा २०२५ मध्ये प्रथम पारितोषिक मिळविले. नांदेड येथे आयोजित राज्यस्तरीय ऑनलाईन प्रश्न मंजुषा कार्यक्रमात उत्पादन अभियांत्रिकीच्या विद्यार्थिनीने प्रथम पारितोषिक मिळविले. तसेच उत्पादन अभियांत्रिकी विभागाने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई पुरस्कृत प्रश्न मंजुषा कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

टाटा मोटर्स, कमिन्स इंडिया, आय एफ बी, बजाज ऑटो, जी. ई. एविएशन आणि सेनवियन विंड टेक्नॉलॉजी या नामांकित कंपन्यामध्ये डिसेंबर २०२४ ते एप्रिल २०२५ या काळात अनुक्रमे १०१, ४०, १४, ६७, २० आणि १९ विद्यार्थी यासह एकूण ३१५ तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्लेसमेंट मिळाले. तसेच उन्नती फाउंडेशन (इन्फोसिस) च्या माध्यमातून एकूण १०० विद्यार्थ्यांना एक महिन्याचे सॉफ्ट स्किल प्रशिक्षण दिल्याची माहिती प्राचार्य डॉ. आगरकर यांनी या दरम्यान दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.दादासाहेब करंजुले यांनी करुन उपस्थितांचे आभार मानले.



माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी यासाठी ख्रिस्ती बांधवांच्या वतीने प्रार्थना सभेचे आयोजन करण्यात आले होते.

# अरुण जगताप यांच्या प्रकृतीत सुधारण्यासाठी ख्रिस्ती बांधवांतर्फे प्रार्थना

**अहिल्यानगर जिल्हा रेव्ह आणि पास्टर्स असोसिएशनची प्रार्थना सभा आशीर्वादित वातावरणात**

नगर – अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट रेव्ह आणि पास्टर्स असोसिएशन तर्फे आयोजित करण्यात आलेली प्रार्थना सभा प्रभू येशूच्या महान कृपेने आशीर्वादित वातावरणात पार पडली. या वेळी अहिल्यानगर जिल्ह्यातील तसेच इतर जिल्ह्यातील बिशप, रेव्ह आणि पास्टर्स उपस्थित होते. यावेळी ख्रिस्ती धर्मगुरूंनी माजी आमदार अरुण जगताप यांच्या आरोग्यासाठी, दीर्घायुष्यासाठी, वयोवृद्ध कल्याणासाठी आणि परमेश्वर त्यांना घरी घेऊन यावा यासाठी एकवटून प्रार्थना केली. रेव्ह विकास दास यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रार्थना सत्र पार पडली.

यावेळी सेवकांमध्ये सिनियर देवाचे दास अपोस्टल बिशप मनोहर सावंत, बिशप तानाजी पाडळे, रेव्ह सुनील गंगावणे, रेव्ह तेजपाल उजगरे, बिशप शमुवेल भिंगारदिवे, रेव्ह विजय काकडे, रेव्ह योहान ओहळ, रेव्ह जोसेफ वैरागर, रेव्ह सादीक, रेव्ह डि डि सोनवणे, रेव्ह प्रकाश बनसोडे, बिशप अशोक पाडळे, रेव्ह रॉबिन सालोमन, रेव्ह नंदकुमार आल्हाट, रेव्ह जयसन वाझ, रेव्ह मनीष गायकवाड, रेव्ह अनिल उजगरे, रेव्ह राजू गोर्डे, रेव्ह सुनील शिंदे, रेव्ह विश्वास घोडके, पा.रोहिदास पराड, रेव्ह मदन खंडागळे, रेव्ह दिपक पाडळे, रेव्ह सुधाकर साळवे, रेव्ह संजय घाटविसावे, रेव्ह सुमंत सोनवणे, पा.सॅम्युअल नाईक, पा.आशिष सावंत, पा.मोजेस नेटके, पा.शमुवेल मगर, पा.स्तवन बल्लाळ, पा.सनी गायकवाड, पा.सुनील वाघमारे, पा.मनोज तायडे, पा.अभिषेक प्रभुणे, पा.अप्पासाहेब अरसूड, पा.सचिन वैराळ, पा.जॉन वाघमारे, पा.संजीवन बल्लाळ, पा.प्रवीण खंडागळे, पा.संतोष साळवे, पा.जोशवा साळवे, पा.मनीष अम्रुत, पा.आंद्रेस लोखंडे, पा.चंद्रहास पिल्ले, पा.मार्कस आगळे, पा.अरुण अब्राहाम, पा.अमित मकासरे, पारनेर पास्टर्स फेलोशिपचे आदरणीय रेव्ह नंदकुमार आल्हाट रेव्ह, अनिल सूर्यवंशी, रेव्ह जयसन वाझ, रेव्ह रवी पठारे, रेव्ह सुखदेव साळवे, पा.विनोद गायकवाड तसेच नेवासा पास्टर्स फेलोशिपचे अध्यक्ष रेव्ह प्रकाश चक्रनारायण, रेव्ह शहारुख पठाण आणि बरेच सेवकगण उपस्थित होते. रेव्ह मिलिंद धिवर शिर्डी येथून प्रार्थना सभेला उपस्थित होते. राहाता पास्टर्स फेलोशिपचे रेव्ह विलास ब्राम्हणे, रेव्ह संतोष वाघमारे. तसेच संभाजी नगर मधुन पा. नितेश नाडे, पा.रॉबिन साळुंखे या प्रार्थना सभेस हजर होते. तसेच शेवगाव व पाथर्डी मधुन देखील सेवकांची उपस्तिती होती. राहुरी मधुन रेव्ह पंडीत तसेच पा. मिलिंद धोत्रे व पा. राजेश पवार हे देखील उपस्थित होते. पा.संध्या कांबळे, पा.वंदना गायकवाड, पा. अनुजा भांबळ, पा.रंजना पवार, पा.मर्लिन, पा.शार्लेट सालोमन, पा.जयश्री वाझ यांचा समावेश होता.

# रामवाडीमधील कष्टकरी वर्गाची मोफत नेत्र तपासणी

## कचरा वेचक, बांधकाम मजूर व इतर कष्टकरी वर्गाला आरोग्य शिबिरांचा आधार



रामवाडी भागातील कचरा वेचक, बांधकाम मजूर व इतर कष्टकरी नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – शहरातील रामवाडी भागातील कचरा वेचक, बांधकाम मजूर व इतर कष्टकरी नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. अंजली चष्मावाला आणि थोरात सुपर स्पेशालिटी आय केअर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या या शिबिराला कष्टकरी वर्गातील नागरिकांचा प्रतिसाद मिळाला.

हे शिबिर माजी नगरसेवक भाऊसाहेब उडाणशिवे यांच्या संपर्क कार्यालयात पार पडले. शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतचे जिल्हा समन्वयक विकास उडाणशिवे, इलियास शेख, संपत शिंदे, विकास घाडगे, विकास वाल्हेकर, सोमनाथ लोखंडे, दिलीप शिंदे, मयूर उडाणशिवे आदी उपस्थित होते.

विकास उडाणशिवे म्हणाले की, रामवाडी ही शहरातील सर्वात मोठी झोपडपट्टी असून येथे कष्टकरी, कचरावेचक व बांधकाम कामगार मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहेत. दैनंदिन श्रमांतून पोटाची गरज भागवणाऱ्या या वर्गाला आरोग्याकडे दुर्लक्ष करावे लागते. आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने दवाखान्याचा खर्च त्यांना परवडत नाही. म्हणूनच अशा आरोग्य शिबिरांची त्यांना गरज असल्याचे त्यांनी सांगितले.या शिबिरात नागरिकांची नेत्र तपासणी अत्याधुनिक मशिनद्वारे करण्यात आली. गरजू रुग्णांवर अल्पदरात मोतीबिंदू, काचबिंदू आणि तिरळेपणा अशा शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. तसेच अल्पदरात नंबरचे चष्मे वाटप करून अनेकांना दिलासा देण्यात आला. शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. रोहित थोरात, रामेश्वर सोलाट, भूषण जाधव आणि संपत शिंदे यांनी सहकार्य केले.



अरुण जगताप यांच्या प्रकृतीसाठी श्री नर्मदेश्वर महादेव मंदिरात महाअभिषेक व महाआरती करण्यात आली. (छाया – लहू दळवी)

# माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्या प्रकृतीसाठी श्री नर्मदेश्वर महादेव मंदिरात महाअभिषेक व महाआरती

नगर – कल्याण रोडवरील श्री नर्मदेश्वर महादेव शिवालय मंदिरात माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी यासाठी महाअभिषेक व महाआरतीचे आयोजन कल्याण रोड येथील अनुसयानगर परिसरातील नागरिकांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी ॲड. युवराज शिंदे, सुधाकर बोल्ली, सतीश लगड, दत्तात्रय मुत्याल, शेषराव आगडे, गणेश बेरड, भुजंगराव कांबळे, शंकर शिरसुल, लक्ष्मण खोडदे, शंकर पाटील, पोपट चव्हाण, राजेंद्र पाडळे, विवेक खोसे यांच्यासह आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना ॲड. युवराज शिंदे म्हणाले की, काका हे सर्वसामान्य जनतेच्या मनात स्थान निर्माण करणारे नेते आहे. त्यांची तब्येत अचानक बिघडल्यामुळे संपूर्ण परिसर चिंतेत आहे. काकांची प्रकृती लवकरात लवकर सुधारावी आणि ते पुन्हा जनतेमध्ये येऊन सर्वांच्या सुख–दुःखात सहभागी व्हावेत, हीच सर्वांची ईश्वर चरणी प्रार्थना आहे. समाजाला त्यांच्या नेतृत्वाची आजही नितांत गरज आहे, असे ते म्हणाले.

# नागरिकांच्या सहकार्यातून रस्त्यात अडथळा ठरणाऱ्या लालटाकी येथील मंदिराचे स्थलांतर

## पत्रकार चौक ते नेप्ती नाका चौक रस्त्याचे ८० टक्के काम पूर्ण; महिनाभरात संपूर्ण रस्ता वाहतुकीसाठी खुला होणार : आयुक्त यशवंत डांगे



नगर – मध्यवर्ती शहर व सावेडी उपनगर परिसराला जोडणारा व वाहतुकीचा प्रमुख रस्ता असलेल्या पत्रकार चौक ते नेप्ती नाका चौक रस्त्याचे काम ८० टक्के झाले आहे. रस्त्याच्या कामात अडथळा ठरणारे लालटाकी येथील वैष्णव मातेचे मंदीर नागरिकांच्या सहकार्यातून स्थलांतरित करण्यात आले आहे. जिल्हा रुग्णालय व वारुळाचा मारुती परिसर येथील मंदिरेही स्थलांतरित केली जाणार आहेत. त्यामुळे येत्या महिनाभरात उर्वरित कामे पूर्ण होऊन संपूर्ण रस्ता नागरिकांना वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.

आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सर्व रस्त्याचा कामाचा आढावा घेतला. शहरातील सर्वाधिक रहदारी पत्रकार चौक ते नेप्ती नाका चौक रस्ता लवकरात लवकर खुला करण्यासाठी नियोजन करून उर्वरित कामे पूर्ण करण्याच्या सूचना यशवंत डांगे यांनी दिल्या. या रस्त्यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी १६.२९ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. लालटाकी येथील श्री वैष्णव माता मंदिर नागरिक व मंदिराच्या विश्वस्तांच्या सहकार्याने स्थलांतरित केले आहे. त्यामुळे वाहतुकीला अडथळा होणार नाही. सदरचा रस्ता २४ फूट रुंद आहे. काँक्रीटीकरण झाल्याने वाहनांचा वेगही वाढणार आहे. अशा स्थितीत रस्त्यात मंदिर तसेच राहिले तर एखादी दुर्घटना होऊन मंदिराचे पावित्र्य धोक्यात आले असते. त्यामुळे नागरिक व विश्वस्तांशी चर्चा केली व त्यांच्या सहकार्यामुळे मंदिर स्थलांतरित केले. वारुळाचा मारुती कमान व नेप्ती नाका चौक येथे असलेले सुशोभीकरण रस्त्यास अडथळा ठरत असल्याने हटवण्यात आले आहे. आता वारुळाचा मारुती कमान येथील मुंजोबा मंदिर व जिल्हा रुग्णालय येथील महालक्ष्मी मंदिर तेथील नागरिकांच्या सहकार्याने स्थलांतरित करण्यात येणार आहे, असे यशवंत डांगे यांनी सांगितले.

सुमारे १७०० मीटर लांबी व २४ मीटर रुंदी असलेल्या या रस्त्याच्या कामामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीमुळे होणारा त्रास टळणार आहे. या रस्त्याचे ८०% काम पूर्ण झालेले आहे. येत्या महिनाभरात संपूर्ण रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने कामे पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच, अप्पू चौकात खाजगीकरणाच्या माध्यमातून नव्याने चौक सुशोभीकरण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे, असेही यशवंत डांगे यांनी सांगितले.

# अहिल्यानगर शहरातील बांधकाम क्षेत्रात पोस्ट टेन्शनिंग तंत्रज्ञानाचे प्रमाण वाढणार

**कुशल खैरनार यांचे प्रतिपादन, आर्किटेक्ट इंजिनिअर्स अँड सर्व्हेअर्स असो. च्या सभासदांना बहुमजली इमारतीतील पोस्ट टेन्शनिंगचे फायदे या विषयावर व्याख्यान**

नगर – आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असो आणि सिद्धेश ग्रूप यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यातील सिद्धेश पोस्ट टेन्शनिंग ग्रुपचे कुशल खैरनार आणि प्रविण वाळवे यांचे बहुमजली इमारतीतील पोस्ट टेन्शनिंगचे फायदे या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. पोस्ट टेन्शनिंग तंत्रज्ञानाचा वापर करून आर सी सी कामातील बिम साईज व स्टील कमी करून टेंडन केबलच्या माध्यमातून स्ट्रेसिंग केले जाते. यामुळे दोन कॉलम मधील बिमचे अंतर कमी डेप्थ असलेला छोटा बिम सेक्शन घेऊन सहज साध्य होते. या तंत्रज्ञानाचा वापर ब्रिजेस, टॉमिक पॉवर स्टेशन, स्टोरेज सायलोज, बिल्डिंग यामध्ये मुख्यत्वे केला जातो. मागील तीन चार वर्षात अहिल्यानगर मध्ये बहुमजली इमारतीचे प्रमाण वाढले असून पार्कींग मधील कॉलम संख्या कमी करणे, बिमची उंची कमी करणे, मोठ्या लांबीचे बिम कास्ट करणे, फ्लोटिंग कॉलम काढणे, खाली शॉप आणि वरील मजले फ्लॅट असतील तर कॉलम शिफ्ट होतात यासाठी पोस्ट टेन्शनिंग तंत्रज्ञानाचा वापर केला जातो, असे प्रतिपादन कुशल खैरनार यांनी केले.





आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असो आणि सिद्धेश ग्रूप यांच्या संयुक्त विद्यमाने बहुमजली इमारतीतील पोस्ट टेन्शनिंगचे फायदे या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. (छाया – लहू दळवी)

कुशल खैरनार पुढे म्हणाले की, कमर्शिअल इमारती, औद्योगिक, हॉस्पिटॅलिटी, मॉल, मल्टिप्लेक्स आणि रहिवासी इमारतीमध्ये या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. पोस्ट टेन्शनिंग म्हणजेच पी टी मध्ये रीब बिम, फ्लॅट स्लॅबसह ड्रॉप, बँडेड बिम स्लॅब आणि फ्लॅट प्लेट अश्या फ्रेमिंग सिस्टीम आहेत. यामध्ये शटरिंग, स्टील बांधणे, टेंडन केबल टाकणे, उच्चतम ग्रेड कॉंक्रिट, तांत्रिक माहिती असलेले लेबर, मटेरियल टेस्टिंग, ग्राऊटिंग, टेंडन स्ट्रेसिंग या गोष्टी महत्वाच्या असतात.

आदिनाथ दहिफळे म्हणाले की, सिद्धेश ग्रूप ही पुणे बेस कंपनी २०१८ मध्ये अस्तित्वात आली असून पूर्ण भारतात ते पोस्ट टेन्शनिंगची सेवा देतात. त्यांची रायपूर, बिलासपूर, भोपाळ येथे कार्यालये असून पुणे येथे मुख्य ऑफिस आहे. पोस्ट टेन्शनिंग मधील डिझाईन आणि एक्सेक्युशन ही महत्वाची दोन कामे कंपनी करते. टाटा स्टीलच्या टेंडन केबल सिद्धेश ग्रुप वापरतात. अहिल्यानगरमधील कांकरिया शोरुम, साई आनंद, मॅजेस्टिक टॉवर, साई लँड मार्क, इलाईट १८ दुसरा फेज अशी विविध कामे त्यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहेत. याचा फायदा नगर शहरातील आर्किटेक्ट इंजिनीअर्स यांना व्हावा यासाठी कार्यशाळांचे आयोजन केले जाते, असे ते म्हणाले.

यावेळी संस्था अध्यक्ष आदिनाथ दहिफळे, सचिव अभिजित देवी, संतोष खांडेकर, सचिन डागा, मयुरेश देशमुख, सुनिल औटी, पंकज झावरे, मानव निमसे, उदित हिरे, सुयोग पवार, राहुल भोसले, सचिन पवार, अन्वर शेख, नागेश खुरपे, आकिब काझी, ओमकार म्हसे, महेश तांदळे, संदीप पाटील, महेश आव्हाड, शुभम आठरे, रवींद्र खर्डे, जयप्रकाश विधाते, संदीप भापकर, संकेत पादिर, आशिष कापसे, सागर ढगे आणि सभासद उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रदिप तांदळे यांनी केले. सचिव अभिजित देवी यांनी आभार मानले.

# चीन, एशियन माऊंटन बाईक सायकलिंग स्पर्धेत अहिल्यानगर येथील प्राणिता सोमनचे उतुंग यश

नगर – चीन मध्ये नुकत्याच पार पाडलेल्या एशियन एम.टी.बी. (माऊंटन बाईक) सायकलिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत भारताचा संघ सहभागी झाला. भारतीय संघाने उतुंग असे यश संपादन केले. या स्पर्धे मध्ये अहिल्यानगरची आंतरराष्ट्रीय खेळाडू प्राणिता सोमन हिने दम दार कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मिक्स टिम रिले या सायकलिंग क्रीडा प्रकारात एकूण तीन महिला व तीन पुरुष भाग घेतात, यामध्ये प्राणिता सोमण, अवनी दरियाल, चरिथ गोवडा, एडोणीस तंगपू, स्टार नारजरी, त्सुवंग नारबू यांनी ०२ तास २२ मिनिटे २७.५४१ सेकंद वेळ नोंदवत कास्य पदक पटकावले.



चीनमधील एशियन माऊंटन बाईक सायकलिंग स्पर्धेत अहिल्यानगरच्या प्राणिता सोमनने उतुंग यश मिळविले.

महाराष्ट्रातील एम.टी.बी. (माऊंटन बाईक) सायकलिंग खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर एशियन चॅम्पियनशिपसाठी निवड झाली आहे. चीनमध्ये होणाऱ्या या प्रतिष्ठित स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी महाराष्ट्रातील तीन खेळाडूंची निवड झाली आहे. एशियन एमटीबी (माऊंटन बाईक) सायकलिंग स्पर्धेत भारताला पहिल्यांदाच पदक मिळाले असून सर्व खेळाडुंचे भारतीयांनी विमानतळावर ढोल ताश्यांच्या गजरात जंगी स्वागत केले.

भारतीय संघामध्ये असणाऱ्या महाराष्ट्रातील खेळाडूंनी देखील उत्कृष्ट कामगिरी करून भारताला पदक मिळून देण्यात मोलाची कामगिरी बजावली असे मत सायकलिंग असोसीएशन ऑफ महाराष्ट्र संघटनेचे मानद सचिव संजय साठे यांनी व्यक्त केले.

या सर्व खेळाडूंना सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र संघटनेचे अध्यक्ष विक्रम रोठे तसेच उपाध्यक्ष अविनाश कदम, यशवंत नडगम, विजय जाधव, अभिजीत मोहिते, प्रा. साईनाथ थोरात, धनंजय वानखेडे व खजिनदार भिकण अंबे यांनी सर्व खेळाडुंचे अभिनंदन केले.

# नगरमधील नृत्यदर्पण संस्थेत जागतिक नृत्य दिन उत्साहात

नगर – महान बॅले नृत्यांगना जीन जॉर्जेस यांच्या वाढदिवसानिमित्त २९ एप्रिल १९८२ रोजी पासून आपण जागतिक नृत्य दिन साजरा करतो. अहिल्यानगरमधील सौ. अपर्णा रोहित थत्ते संचलित नृत्यदर्पण संस्थेत या दिनानिमित्त त्यांच्या विद्यार्थ्यांनी विविध नृत्यांचे सादरीकरण केले.

यावेळी तिसरी व सहावी च्या सर्व विद्यार्थिनी, शितल, सुजाता, अश्विनी मॅडम उपस्थित होत्या.



नृत्यदर्पण संस्थेत जागतिक नृत्य दिन उत्साहात साजरा करताना सहभागी झालेले मार्गदर्शक व विद्यार्थिनी.



आनंदधाम येथे अक्षय्य तृतीयेनिमित्त वर्षी तप पारणा महोत्सवामध्ये मार्गदर्शन करताना कुंदनऋषीजी म.सा.. शेजारील छायाचित्रात उपस्थित श्रावक–श्राविका.

# आनंदधाम येथे अक्षय्य तृतीयेनिमित्त वर्षी तप पारणा महोत्सव उत्साहात

नगर – आचार्यश्रींची पवित्र पावन भूमी आनंदधाम येथे अक्षय्य तृतीयेनिमित्त विविध कार्यक्रम उत्साहात पार पडले. महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म.सा., प्रबुद्ध विचारक श्री आदर्शऋषिजी म. सा., आलोकऋषीजी म.सा. यांच्यासह सेवाभावी श्री सत्यप्रभाजी म., श्री ज्योत्स्नाजी म.सा., श्री विपुलदर्शनाजी म.सा., श्री उदयप्रभाजी म.सा., श्री पुष्पकवरजी म., श्री दिव्यदर्शनाजी, श्री विश्वदर्शनाजी म., श्री विचक्षणाजी म, श्री पुष्पचूलाजी म, श्री आराधनाजी म, आदि ठाणा यांच्या सान्निध्यात वर्षीतप पारणा महोत्सव उत्साहात पार पडला.


यावर्षी ११ साध्वी यांच्यासह ११० श्रावक श्राविकांनी वर्षीतप उपवास केला होता. या सर्वांचा जैन श्रावक संघ, धार्मिक परीक्षा बोर्ड व जैन कॉन्फरन्स चतुर्थ झोन महिला शाखा यांच्यावतीने सन्मान करण्यात आला.

कुंदनऋषीजी म.सा.म्हणाले की, अक्षय्य तृतीया हा दिवस पर्व दिवस म्हणून साजरा केला जातो कारण दान व तप हे मोक्ष प्राप्तीचे प्रमुख मार्ग आहेत. प्रत्येकाने या शिकवणुकीचे आचरण केले पाहिजे. या पवित्र दिवशी केलेले कोणतेही सत्कार्य, दान हे अक्षय मानले जाते. यादिवशी आहार दान, ज्ञानदान केले पाहिजे.

साधूसाध्वीजींनी आपल्या प्रवचनात अक्षय्य तृतीयेचे महत्व विशद करून तपस्वींचे कौतुक केले. वर्षी तपाला जैन धर्मात अतिशय महत्व आहे. प्रथम तीर्थंकर आदिनाथ ऋषभदेव भगवान हे आपले राज्य मुलांमध्ये वाटून टाकल्यानंतर तपस्वी बनले. जवळपास एक वर्षभर त्यांनी उपवास केले. ते हस्तीनापुरात गेले तेव्हा त्यांना ऊसाचा रस प्यायला मिळाला. तो दिवस अक्षय्य तृतीयेचा होता. तेव्हापासून जैन धर्मात याकाळात वर्षी तप पारणा करताना उसाचा रस घेतात. यावर्षी नगरमध्ये तब्बल ११० जणांनी वर्षी तप केले. यावेळी प्रियदर्शनी बहु मंडळाने भावा गीत सादर केले.

यावेळी श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत, सेक्रेटरी संतोष बोथरा, संतोष गांधी, उपाध्यक्ष आनंदराम मुनोत, सतीश लोढा, रतिलाल कटारिया, आनंद चोपडा, अभय लुणिया, नितीन शिंगी, प्रितम गांधी, अनिल मेहेर, अमोल कटारिया, राजेश बोरा, मनिषा मुनोत आदींसह श्रावक श्राविका उपस्थित होते. आचार्यश्रींच्या ध्वनीमुद्रीत मंगलपाठाने कार्यक्रमाची सांगता झाली. अक्षय्य तृतीयेनिमित्त गौतम प्रसादीची व्यवस्था करण्यात आली होती.

तपस्वी अभय लुणिया म्हणाले, वर्षभर एकासना वर्षी तप केल्याने मनाला खूप समाधान, शांती लाभली. स्वत:च्या आत्मविश्वासात मोठी वाढ झाल्याची अनुभूती येते. या काळात भगवंताची उपासना झाली. साधूसाध्वीजींच्या सान्निध्याचा लाभ मिळाला तसेच सेवा करण्याची संधी मिळाली.






लिंगायत हटगर कोष्टी समाज संस्था महाराष्ट्र राज्य संघटना जिल्हा अहिल्यानगर आणि जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंती साजरी करण्यात आली.

# बसवेश्वर जयंती निमित्त रक्तदान शिबीर उत्साहात

भिंगार – लिंगायत हटगर कोष्टी समाज संस्था महाराष्ट्र राज्य संघटना जिल्हा अहिल्यानगर आणि जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंती निमित्त पहिल्या वर्षी आयोजित रक्तदान शिबीरामध्ये २५ रक्तपिशव्यांचे संकलन झाले.

सदर कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून अशोक गलांडे, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आशिष बिडवे, डॉ.सौ. पल्लवी बिडवे, जिल्हा रुग्णालयाच्या रक्त संक्रमण अधिकारी डॉ. सुमैय्या खान हे उपस्थित होते.

हौडगे सर, हंचे सर, डॉ. अविनाश महाजन, शिवम भंडारी, वसंत राठोड आदी उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ.आशिष बिडवेंनी रक्तदानाविषयी माहिती दिली.

कार्यक्रमासाठी प्रा. शितल प्रभाकर वांढरे (महिला उपाध्यक्षा महाराष्ट्र राज्य संघटना), संदीप सोनसळे (जिल्हा अध्यक्ष), सुनिल कानडे (जिल्हा उपाध्यक्ष), सुधीर कडते (जिल्हा सचिव), किशोर कटोरे (जिल्हा कार्याध्यक्ष), सोमनाथ आमले (जिल्हा सहकार्याध्यक्ष), कैलास बिडवे काका (सुकाणू समिती सदस्य), सात्विक बिडवे (जिल्हा युवा अध्यक्ष), नितीन सोनसळे (जिल्हा कार्यकारिणी सदस्य), सुजित गोटे (जिल्हा कार्यकारिणी सदस्य), शाम पारेकर (तालुका अध्यक्ष), सौ. सीमा वाळुजकर (तालुका महिला अध्यक्ष), सौ.स्वाती सोनसळे (जिल्हा महिला कार्यकारिणी सदस्य), सौ. वैशाली कटोरे (जिल्हा महिला कार्यकारिणी सदस्य), सौ. मयुरी ढोले (जिल्हा कार्यकारिणी सदस्य), सौ. शुभांगी आमले (शहर महिला प्रतिनिधी), सौ. वैशाली कोंगे (भिंगार महिला कार्याध्यक्ष), सौ. सुप्रिया बिडवे, सौ. अनुराधा गोटे उपस्थित होते.

प्रास्ताविक प्रा. शितल वांढरे यांनी केले. सूत्रसंचालन सौ. सीमा वाळुजकर यांनी केले. किशोर कटोरे यांनी आभार मानले.

## जाहीर नोटीस

तमाम सर्व लोकांस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-**

जिल्हा अहिल्यानगर, पोट तुकडी तालुका अहिल्यानगरपैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, मा. सहदुय्यम निबंधक, वर्ग–२ अहिल्यानगर यांचे कार्यकक्षेतील मौजे माळीवाडा येथील संगणकीय ७/१२ रेकॉर्डनुसार सर्व्हे नंबर १५६ / प्लॉट ४० (पूर्वीचा सर्व्हे नंबर ८४ + १२५ / अ+१२५/ब मधील प्लॉट नंबर ४०) याचे एकूण क्षेत्रफळ ६०३.०० चौ. मी. ही संपूर्ण बिगरशेती प्लॉट मिळकत.

**यांसी चतु:सीमा पुढीलप्रमाणे -**

पूर्वेस : रस्ता
दक्षिणेस : प्लॉट नंबर ४१ आणि ४२
पश्चिमेस : प्लॉट नंबर ३५
उत्तरेस : प्लॉट नंबर ३९

येणेप्रमाणे बिगरशेती प्लॉट मिळकतीचे विद्यमान मालक १) गांधी अशोकलाल अभयकुमार (HUF) पत्ता – नवजीवन कॉलनी, कोठी रोड, मार्केटयार्ड मागे, अहिल्यानगर आणि २) श्री. शैलेशकुमार पोपटलाल गांधी पत्ता – मार्केटयार्ड, अहिल्यानगर आहेत.

सदरील विद्यमान मालकांनी वर वर्णन केल्यानुसार संपूर्ण प्लॉट मिळकत आमचे पक्षकारास कायमखूश खरेदीने विकण्याचे ठरविले आहे. तसेच सदरील प्लॉट मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आणि बोजाविरहीत आहे, असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.

परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, सदरील मिळकतीबाबत कोणताही वाद चालू असल्यास अथवा गहाण, दान, तारण, बक्षिसपत्र, अव्वलजप्ती, बँकेचा बोजा, भाडेकरार, साठेकरार, मनाई हुकुम, स्थगिती, ताबा, पोटगी, इजमेंट, चार्ज, लीन अथवा इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० (दहा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हांस कळवावे आणि आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

तारीख ३०/०४/२०२५
अहिल्यानगर.

**ॲड. दीपक मुरलीधर शर्मा**
**ॲड. शालिनी दीपक शर्मा**
ऑफीस – मुनोत चेंबर्स, नवीपेठ, अहिल्यानगर.
मोबाईल नंबर – ९४२२२ ३४७४४

# 'एफसीए'तर्फे वाणिज्य शाखेतील विविध करिअर संधींवर सेमिनार


नगर – वाणिज्य शाखेतील विविध करिअर संधींवर एक विशेष सेमिनार आयोजित करण्यात आल्याची माहिती एफसीए अकादमीचे संस्थापक संचालक सीए पवनकुमार दरक यांनी दिली.

ते म्हणाले, या सेमिनारमध्ये विद्यार्थ्यांना सीए, सीएस, सीएमए, सीएफए आणि बॅचलर पदवी जसे की बीकॉम, बीबीए, बीसीए आणि मास्टर डिग्री जसे की एमकॉम, एमबीए, एमसीए, एमसीएम, एमएसडब्ल्यू बद्दल माहिती मिळेल. वरील व्यतिरिक्त विद्यार्थ्यांना सीपीए, सीएफए, एफआरएम, एसीसीए सारखे परदेशी अभ्यासक्रम आणि बँकिंग, रेल्वे, आरबीआय, पोस्ट ऑफिस इत्यादी सरकारी नोकऱ्यांमध्ये संधींबद्दल माहिती मिळेल.

३ मे रोजी एस. व्ही. एन. ट्युटोरियल्स, प्रगती डेअरी, गुलमोहर रोड, अहिल्यानगर येथे आणि ४ मे रोजी एफसीए अकादमी, लोढा हाईट्स, नवीपेठ अहिल्यानगर येथे हे सेमिनार होणार आहे.

दहावी बोर्ड परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी हे सेमिनार मोफत आहे. सेमिनारला उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना ५ मे पासून सुरू होणाऱ्या मोफत कॉमर्स ब्रिज कोर्समध्ये सहभागी होण्याची संधी देखील मिळेल.

इच्छुक विद्यार्थी ८६००८९०६८३ / ७६२०४९२०९२ वर नोंदणी करू शकतात.



# चंद्रावरच्या पाण्याचे उलगडले कोडे

चंद्रावर पाणी कसे असू शकते, याबद्दल अनेक दशकांपासून शास्त्रज्ञ गोंधळून गेले आहेत. चंद्रावरील हवामान कोरडे आहे. तेथे वारा नाही. वातावरणाचा अभाव आहे. यामुळेच चंद्रावर पाण्याच्या अस्तित्वाचे गूढच राहिले आहे. गेल्या अनेक वर्षांत यावर बरेच संशोधन झाले आहे. काही संशोधनात यामागे सूक्ष्म उल्का हे कारण असल्याचे सांगण्यात आले. त्याचवेळी आणखी एका संशोधनाने येथील पुरातन खड्ड्यांमध्ये साचलेल्या पाण्याच्या साठ्याकडे लक्ष वेधले.

अमेरिकन स्पेस एजन्सी 'नासा'ने नुकत्याच केलेल्या संशोधनात या प्रश्नाचे उत्तर दिले असून पूर्वीची उत्तरे पूर्णपणे नाकारली आहेत. सौर वारे थेट चंद्राच्या मातीत पाणी तयार करू शकतात, असे 'नासा'च्या संशोधनात म्हटले आहे. 'नासा'च्या गोडार्ड स्पेस फ्लाइट सेंटरमधील संशोधन शास्त्रज्ञ ली सिया येओ आणि त्यांच्या टीमने हे संशोधन केले आहे. चंद्रावर असणाऱ्या पाणीविषयक प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी शास्त्रज्ञांनी एक वास्तववादी सिम्युलेशन तयार केले आणि सौर वाऱ्याचा चंद्रावर कसा परिणाम होतो हे समजून घेण्याचा प्रयत्न केला.

'नासा'चे संशोधक जेसन मॅक्लेन म्हणाले की, संशोधनासाठी चंद्राचे डुप्लिकेट वातावरण तयार करण्यात आले होते. तेथे वारा नव्हता. यासाठी एक अनोखे चेंबर वापरले गेले आणि त्यातून सौर बीम पार केला गेला. अशाप्रकारे व्हॅक्यूम परिस्थिती तयार केली गेली आणि एक रेणू शोधक वापरला गेला. मॅक्लीन म्हणतात की, या संशोधनासाठी ऑपरेटर्स डिझाइन करण्यासाठी बराच वेळ लागला पण त्याचा फायदा झाला. यानंतर याचा सौर वाऱ्याशी विशेष संबंध असल्याचे आढळून आले. या प्रयोगादरम्यान, १९७२ मध्ये 'नासा'च्या अपोलो मिशन १७ दरम्यान चंद्रावरून आणलेल्या मातीचा नमुना वापरण्यात आला.

चंद्रावर पाणी कसे आले?

सूर्यामुळे चंद्रापर्यंत पाणी कसे पोहोचले याविषयी शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे, की सूर्याची किरणे चंद्रावर पाण्याच्या अस्तित्वाशी जोडलेली आहेत. सौर वारे वाहतात आणि सौर वाऱ्याचे प्रोटॉन चंद्राच्या पृष्ठभागावर आदळतात तेव्हा त्यांना कोणत्याही प्रतिकाराचा सामना करावा लागत नाही. पृथ्वीचे चुंबकीय क्षेत्र आणि वातावरण या कणांपासून संरक्षण करतात; परंतु चंद्रावर या दोन्ही गोष्टींचा अभाव आहे. त्यामुळे त्याचा परिणाम तिथे दिसून येतो. हे प्रोटॉन चंद्राच्या इलेक्ट्रॉनशी टक्कर देतात. त्यामुळे ते हायड्रोजन अणू तयार करतात. हे हायड्रोजन अणू नंतर सिलिकासारख्या खनिजामध्ये ऑक्सिजनसह एकत्रित होऊन हायड्रॉक्सिल आणि पाणी बनतात. संशोधक येओ म्हणतात, आश्चर्याची गोष्ट म्हणजे चंद्राच्या मातीत असणारे घटक सूर्यापासून आले आहेत. नेहमी हायड्रोजन उत्सर्जित करणाऱ्या सूर्याकडून येणारी चंद्राची माती आणि मूलभूत घटक यातूनच पाणी तयार होण्याची शक्यता असते.

शोध कसा लागला?

संशोधनादरम्यान संशोधकांनी स्पेक्ट्रोमीटरचा वापर केला. त्याच्या मदतीने चंद्राच्या मातीतील रसायनांचे निरीक्षण केले असता त्यात ठराविक काळानंतर बदल होत असल्याचे आढळून आले. त्यांनी सुमारे तीन मायक्रॉन इन्फ्रारेड शोषणात घट पाहिली, जे पाण्याच्या उपस्थितीचे चिन्ह आहे. मात्र किती शुद्ध पाण्याची निर्मिती झाली हे स्पष्टपणे सांगता आलेले नाही. त्यात हायड्रॉक्सिल आणि पाण्याचे दोन्ही रेणू तयार झाल्याचे डेटावरून स्पष्ट झाले आहे.

# कॅलिडोस्कोप

## आयर्लंडमध्ये साप का नाहीत?



ब्राझीलमध्ये भरपूर साप आढळतात. जगातल्या विविध देशांमध्येही साप पहायला मिळतात. मात्र एका देशात साप अस्तित्वातच नाहीत. कोणत्या देशात साप नसावेत, असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. आयर्लंड या देशात साप नाहीत. यामागे बरीच कारणं आहेत. काही पौराणिक कथाही आहेत. त्यानुसार सेंट पॅट्रिक नावाच्या एक संताने ख्रिस्ती धर्माच्या सुरक्षेसाठी इथल्या सर्व सापांना गोळा केलं आणि समुद्रात फेकून दिलं. यासाठी त्यांना ४० दिवस उपाशी रहावं लागलं. ही झाली आख्यायिका. पण काही शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार आयर्लंडमध्ये कधीही साप नव्हते. या भागात एकेकाळी साप असले तरी प्रचंड थंडीमुळे ते नष्ट झाले, असं काही शास्त्रज्ञांचं मत आहे. प्रचंड थंडीमुळे इथले साप नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हेच कारण ग्राह्य धरलं जातं.

## पक्ष्यांची वसाहत

सर्वसाधारणपणे माणसांसाठी वसाहती तयार केल्या जातात. पण गाझियाबादमध्ये पक्ष्यांसाठी वसाहत तयार करण्यात आली आहे. गाझियाबाद विकास महामंडळाच्या संचालकांच्या घराच्या गच्चीवर पक्ष्यांसाठी पाच मजली इमारत उभारण्यात आली आहे. हा पक्ष्यांसाठीचा गृहप्रकल्प आहे. या गृहप्रकल्पासाठी दोन लाख रुपये खर्च करण्यात आले. या प्रकल्पात ६० घरटी आहेत. म्हणजे प्रत्येक मजल्यावर १२ पक्षी राहू शकतात. ऊन आणि पावसापासून बचावासाठी या इमारतीवर छत्री लावण्यात आली आहे. चिमणी, बुलबुल, पोपट असे पक्षी इथे राहू शकतात. पक्ष्यांची घरटी लाकडापासून तयार करण्यात आली आहेत. पक्ष्यांचं हे अनोखं अपार्टमेंटच आहे. हा प्रकल्प प्राथमिक स्तरावर सुरू करण्यात आला आहे. इथे पक्षी राहू लागले तर शहरातल्या इतर इमारतींवरही अशाप्रकारे पक्ष्यांसाठी गृहप्रकल्प उभारण्यात येईल. याला 'बर्ड टॉवर' असं नाव देण्यात आलं असून सात फुटांचा हा मनोरा गाझियाबादमध्ये आकर्षणाचं केंद्र ठरला आहे. पक्ष्यांची संख्या वाढवणं आणि त्यांना अधिवास उपलब्ध करून देणं हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.






## जुन्या पासबुकने बदलले नशीब!

कधी कधी अचानक आयुष्याला कलाटणी मिळते. एखादा जुना कागद नशीब बदलून टाकतो. सध्या असाच एक किस्सा चिलीतून समोर आला आहे. वडिलांच्या पासबुकने त्या व्यक्तीला करोडपती बनवले. याची त्याने कधी कल्पनाही केली नव्हती.

हिनोजोसा नावाच्या माणसाला रद्दीत हा खजिना सापडला आणि काही काळातच तो करोडपती बनला. हा किस्सा लोकांना समजला तेव्हा सर्वजण म्हणू लागले की, नशीब असावे, तर असे. हा माणूस वडिलांच्या मृत्यूनंतर त्याच्या वस्तूंची वर्गवारी करत असताना खूप जुने, धुळीने माखलेले पासबुक सापडले. सुरुवातीला कचरा समजून त्याने दुर्लक्ष केले. मात्र मनात कुतूहल निर्माण झाले आणि त्याने पुन्हा एकदा पासबुक काळजीपूर्वक पाहिले. यावेळी त्याला रहस्य कळले ज्याचा त्याने स्वप्नातही विचार केला नव्हता. आता तो लवकरच करोडपती होणार आहे.

पैसे कसे मिळाले?

१९६०-७० च्या दरम्यान हिनोजोसाच्या वडिलांनी घर घेण्यासाठी १.४ लाख रुपये वाचवले होते. परंतु काही वर्षांपूर्वी ती बँक बंद पडली होती. त्यामुळे कुटुंबीयांना याबाबत काहीच माहिती नव्हती. मात्र पासबुकवर स्टेट गॅरंटी लिहिली होती. म्हणजे बँक बंद झाली तरी जमा केलेली रक्कम परत करण्याची जबाबदारी सरकारची असेल, असे त्यात नमूद करण्यात आले होते. याच्या आधारे त्या व्यक्तीने शासनाकडे मागणी केली असता सरकारने ती फेटाळून लावली.

न्यायालयाचा दणका

हार न मानता हिनोजोसाने पैसे मिळवण्यासाठी सरकारला न्यायालयात खेचले. अखेर प्रदीर्घ कायदेशीर लढाईनंतर न्यायालयाने त्यांच्या बाजूने निकाल दिला आणि सरकारला ६२ वर्षांच्या व्याजासह मूळ रक्कम परत करण्याचे आदेश दिले. न्यायाधीशांच्या आदेशामुळे व्याजासह ही रक्कम सुमारे १० कोटी रुपये (१.२ दशलक्ष डॉलर्स) वाढली. ध्यानीमनी नसताना हिनोजोसावर पैशाचा पाऊस पडला.



## शेवटची फ्लाईट...!

एका विमान कंपनीची फ्लाईट अटेंडन्ट नेहमीप्रमाणे नोकरीवर हजर झाली आणि विमानाने टेकऑफ घेताच प्रवाशांची सेवा करू लागली. पण तिच्या नशीबात काही वेगळेच होते. तिने कधी याचा विचारही केलेला नव्हता. आपल्याबाबत असे इतक्या लवकर कसे घडू शकते याचा विचारच तिच्या मनात आला नव्हता. त्यामुळेच तिने स्वत:ला चिमटा काढून पाहिला आणि आपण स्वप्नात तर नाही ना... याची खात्री करून घेतली.

तिची ही अवस्था होण्याचे कारण म्हणजे कॅसिनो गेममध्ये ५०० रुपये लावून तिने तब्बल २१ कोटीची रक्कम जिंकली होती. कॅसिनो डेज प्लॅटफॉर्मवर एक लिमिटेड ऑफर सुरू होती. त्यात एक लाख रुपयांच्या जमा रकमेवर १५० टक्के बोनस मिळत होता. एअर होस्टेस म्हणाली की, हा गेम खेळताना आधी मी एक लाख रुपये लावले. आधी मला दहा कोटी आणि नंतर २० कोटी व शेवटी २१,८३,०२,६७२ कोटी रुपये इतकी रक्कम मिळाली. ती माझ्या खात्यात जमा झाली. हे कळल्यावर खरेतर स्वत:वरच विश्वासच बसत नव्हता. ही रक्कम जिंकल्यानंतर तिने कॅसिनो डेजच्या सपोर्ट टीमला संपर्क साधला. त्यांनी सांगितले की बातमी खरी आहे. तुम्ही करोडपती झाला आहात. पुढे या महिलेने फ्लाईटचा इंटरकॉम उचलला आणि थेट घोषणाच करून टाकली. 'लेडीज एण्ड जंटलमन, मी तुमची एअर होस्टेस बोलत आहे आणि माझी ही शेवटची फ्लाईट आहे...' हे वाक्य ऐकून प्रवासी घाबरले. परंतु एअर होस्टेसने खरी बाब सांगितली. त्यानंतर प्रवाशांनी तिला शुभेच्छा देण्यास रांग लावली आणि केबिनमध्ये उपस्थित लोक चियर्स करू लागले.

## उत्तर कोरियात सॅनिटरी पॅडवर बंदी



उत्तर कोरियात किम जोंग हा हुकूमशहा आहे. तो आणि त्याची बहीण केव्हा काय निर्णय घेतील, हे सांगता येत नाही. या देशात नानातऱ्हेचे अजब-गजब कायदे आहेत. त्यातच आता तेथे महिलांना मासिक पाळीच्या काळात सॅनिटरी पॅड वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे.

भारतात सॅनिटरी पॅड मशीन सगळीकडे बसवण्याची मागणी जोर धरत असताना या देशातील हुकूमशहाने हा अजब फतवा काढला आहे. मासिक पाळीविषयी आता समाजात मोकळेपणाने बोलले जाते. ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. पूर्वी शिवाशिव, कावळा शिवला, कावळा बसला असे सांकेतिक भाषेत हे सांगत असे. मात्र आता भारतीय समाजात बरेच बदल दिसत आहेत. मासिक पाळीमध्ये महिलांना शारीरिक आणि मानसिक त्रास होतो. या काळात महिलांना बाहेर फिरताना, कार्यालयीन काम करताना अडचणींचा सामना करावा लागतो.

या काळात काळजी घेता यावी म्हणून बाजारात सॅनेटरी पॅड्स, मेंस्ट्रूअल कप्स आणि पीरियड पँटी अशा अनेक गोष्टी उपलब्ध असतात. त्यांचा वापर करून महिला आरामशीरपणे आणि आरोग्य जपत काम करू शकतात. स्वच्छतेची काळजी घेणेही शक्य होते. पण किम जोंगच्या राज्यात सॅनेटरी पॅडसह इतर वस्तूंवर बंदी घालण्यात आली आहे. आता उत्तर कोरियाच्या बाजारात सॅनेटरी पॅड नाहीत. त्यामुळे या देशातील महिला आणि मुलींना मासिक पाळीच्या काळात कपड्यांचा वापर करावा लागत आहे. एकदा वापरलेले कपडे धुवून त्याचा पुन्हा वापर करण्यात येतो. किम जोग सरकारने सॅनिटरी पॅड्सचे उत्पादन आणि आयातीवर निर्बंध घातले आहेत.

## पॉपकॉर्नविषयी...

चित्रपट बघताना पॉपकॉर्न खाल्ले जातात. या सुट्टीच्या दिवसांमध्ये मुलांची छोटी भूक भागवण्यासाठीही पॉपकॉर्न हा उत्तम पर्याय असतो. एकूणच पॉपकॉर्न हा अनेकांचा आवडता पदार्थ आहे. तेव्हा पॉपकॉर्न खाण्याची सुरुवात नेमकी कधी झाली, याचा इतिहास काय याबद्दल रंजक माहिती जाणून घेऊ.




* प्राचीन काळात अमेरिकेतले मूळ निवासी पॉपकॉर्न खात असत. मग युरोपियन लोकांनीही पॉपकॉर्न खायला सुरुवात केली, असं म्हटलं जातं.
* पॉपकॉर्न तयार करणारं मशीन १३४ वर्षांपूर्वी म्हणजे १८८५ मध्ये तयार करण्यात आलं. अमेरिकेतल्या चार्ल्स क्रेटरने हे मशीन तयार केलं होतं. चार्ल्स शेंगदाणे भाजणारं मशीन बनवण्याच्या प्रयत्नात होता. मात्र नंतर त्याचा वापर पॉपकॉन बनवण्यासाठी होऊ लागला.
* जवळपास चार हजार वर्षांपूर्वी पॉपकॉर्नचा शोध लावण्यात आल्याचं म्हटलं जातं. न्यू मेक्सिकोमध्ये हा शोध लावण्यात आला. त्या काळात पॉपकॉर्नचा वापर सजावटीसाठी केला जात असे. पॉपकॉर्नपासून दागिने बनवले जात असत, असंही म्हटलं जातं.

## वधू-वर हरवले एकमेकांच्या डोळ्यात!

लग्न म्हणजे केवळ दोन माणसांचं मीलन नसून ते दोन हृदयाचंही मीलन असतं आणि ते सुंदर रीतीने सगळ्यांसमोर आलं तर की सगळ्यांनाच आनंद होतो. असाच क्षण एका लग्नसमारंभात पाहायला मिळाला जेव्हा वधू-वर अचानक एकमेकांच्या डोळ्यात हरवून गेले आणि स्टेजवर 'तुमसा कोई प्यारा' गाण्यावर नाचू लागले. हा कोणताही दिखावा नव्हता, नाटक नव्हते तर एकमेकांप्रती असणाऱ्या सर्वांगसुंदर भावनेत साधेपणाने गुंडाळलेले खरे प्रेम होते.



त्यांना असे एकमेकांमध्ये हरवलेले बघून संपूर्ण वातावरणच प्रेमाच्या प्रकाशाने भरुन गेले.

लग्न असेल आणि त्यात प्रेमाची झलक नसेल तर उत्सव अपूर्णच वाटतो. पण या लग्नात वधू-वरांनी असे काही केले की सर्वांचे डोळे ओलावले आणि मन हसले. स्टेजवर 'तुमसा कोई प्यारा, कोई मासूम नहीं है...' च्या धूनवर दोघांनी रोमँटिक नृत्य करायला सुरुवात केली तेव्हा संपूर्ण वातावरण स्तब्ध झाल्यासारखे वाटले. हा लग्नसोहळा पारंपारिक पद्धतीने सुरू होता. विधीही याच पद्धतीने केले जात होते. मात्र संगीत सुरू होताच अचानक स्टेजवर उभ्या असणाऱ्या वधू-वरांनी एकमेकांचा हात धरला आणि गाण्यावर नाचायला सुरुवात केली. त्यात कोणत्याही उसने अवसान आणून वा सरावाने केलेल्या हालचाली नव्हत्या. ओव्हरड्रामॅटिक हालचालही नव्हती तर दोघांच्याही डोळ्यांमध्ये एकमेकांबद्दलचे प्रेम तीव्रतेने वाहत होते. वधूचे लाजून हसणे, वराचा साधेपणा आणि त्यांच्या दोघांमधील केमिस्ट्रीने विवाह मंडपाचे प्रेमाच्या मंदिरात रुपांतर झाल्याचेच सगळ्यांना जाणवले.

## असा आहे महागडा तुरुंग

तुरुंग म्हटला की तिथे कैदी असणारच. या कैद्यांवर प्रशासन बराच पैसाही खर्च करतं. त्याच्या रहाण्याची, खाण्याची, आरोग्याची व्यवस्था प्रशासनालाच करावी लागते. जगभरात अनेक तुरुंग आहेत. भारतातलेही बरेच तुरुंग प्रसिद्ध आहेत. मात्र जगातला सर्वात महागडा तुरुंग कोणता हे तुम्हाला माहीत आहे का? हा तुरुंग क्युबामध्ये आहे. इथे एका कैद्यावर कोट्यवधी रुपये खर्च होतात. 'ग्वांतानमो बे' असं या तुरुंगाचं नाव आहे. हा तुरुंग ग्वांतानमो खाडीच्या किनाऱ्यालगत आहे. या तुरुंगात ४० कैदी असून प्रत्येक कैद्यावर वर्षाला ९३ कोटी रुपये खर्च होतात. हा आकडा ऐकून प्रत्येकाचे डोळे विस्फारले असतील. या तुरुंगात १८०० पोलीस आहेत. प्रत्येक कैद्यामागे ४५ पोलीस आहेत. तुरुंगाच्या सुरक्षेसाठीच दरवर्षी ३९०० कोटी रुपये खर्च होतात. या तुरुंगात जागतिक स्तरावरचे अत्यंत धोकादायक कैदी आहेत. या तुरुंग परिसरात तीन इमारती असून दोन इमारतींमध्ये गुप्त मुख्यालयं आहेत. तसंच दोन रुग्णालयंही आहेत. वकिलांसाठीही वेगळी सोय करण्यात आली आहे. इथे वकील कैद्यांशी संवाद साधू शकतात. इथल्या कैद्यांना बऱ्याच सुविधा दिल्या जातात.






नगर शहराजवळील अरणगाव, मेहेराबाद येथील हराळमळा येथे पिंजऱ्यात जेरबंद झालेला बिबट्या व दुसऱ्या छायाचित्रात सदर पिंजरा नेताना वनविभागाचे पथक.

# वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद

नगर – नगर शहराजवळील अरणगाव, मेहेराबाद येथील हराळमळा व लगत सोनेवाडी परीसरात मुक्त संचार करीत असलेला नर बिबट्या अखेरीस वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात २९ एप्रिल रोजी जेरबंद झाला आहे. सदर पिंजरा २८ एप्रिलला वनविभागाकडून लावण्यात आला होता.

पिजऱ्यात बिबट्या जेरबंद झाल्याचे समजताच वनविभागाचे विजय चेमटे, वनरक्षक अशोक गाडेकर, वनपाल गायकवाड, वन्यजीव अभ्यासक हर्षद कटारीया, संदिप ठोंबरे, बाळासाहेब रणसिंग, सोनेवाडीचे गोरक्ष जगन्नाथ दळवी, हराळ मळ्यातील सुट्टिवर आलेले बीएसएफचे जवान प्रसाद हराळ यांच्यासह परिसरातील शेतकरी यांनी घटनास्थळी धाव घेतली. या सर्वांच्या सहकार्याने वन विभागाने जेरबंद झालेल्या बिबट्याचा पिंजरा तेथून नेला. बिबट्या जेरबंद झाल्याने परिसरातील नागरीकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

अरणगाव मेहेरबाद येथिल हराळ मळ्यात दीड वर्षांपूर्वी अक्षय हराळ यांचे पाळीव कुत्र्यावर जंगली हिंस्र प्राण्याने हल्ला करून ठार मारल्याचे निदर्शनास आले होते, तेव्हापासून अधून मधून हराळमळा व लगत सोनेवाडी परीसरात बिबट्याचा मुक्त संचार होता, सीआरपीएफचे पोलिस निरीक्षक सचिन हराळ यांचे उसाच्या शेतात ऊस तोड चालु असताना ४ दिवसापूर्वी वासराचा मृतदेह व बिबट्याचे पावलाचे ठसे दिसले होते. ही माहिती वनविभागाला कळविण्यात आल्यावर वनरक्षक अशोक गाडेकर व बाळासाहेब रणसिंग यांच्या सह पथकाने परिसराची पहाणी करून परीसरात पिंजरा लावला होता. बीएसएफचे जवान प्रसाद हराळ यांचे ४ दिवसात मोठे सहकार्य झाले दोन दिवसापूर्वी रात्री त्यांना बिबट्या दिसला व त्यांना माहिती असल्याने बिबट्याचे पायाचे ठसे घेण्यापासून ते वन विभागाला माहिती देऊन जवळच लावलेला सोनेवाडी येथील पिंजरा हराळ मळा येथे आणण्यास व लावण्यास सहकार्य केले व त्यावर नजर ठेवली होती. बिबट्या जेरबंद झाल्याने ग्रामस्थांनी प्रसाद हराळ यांचे कौतुक केले.

## नगरमधील सराईत गुन्हेगार सहा महिन्यांसाठी हद्दपार

नगर – नगर शहरातील पोलिस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार करण कृष्णा फसले, (वय ३२, रा. खिस्त गल्ली, अ.नगर) यास नगर जिल्ह्याचे हद्दीतून सहा महिन्यासाठी हद्दपार करण्यात आले आहे. याबाबतचे आदेश प्रांताधिकारी सुधीर पाटील यांनी नुकतेच काढले असून कोतवाली पोलिसांनी त्या आदेशाची अंमलबजावणी केली आहे.

करण फसले याच्यावर कोतवाली पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे सहा व एक अदखलपात्र एक असे सात गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे कोतवाली पोलिसांनी त्याच्या हद्दपारीचा प्रस्ताव नगरचे उपविभागीय दंडाधिकारी तथा प्रांताधिकारी सुधीर पाटील यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविला होता. त्या प्रस्तावास प्रांताधिकारी पाटील यांनी मंजुरी दिली आहे. सदर आदेश प्राप्त होताच कोतवाली पोलिसांनी करण फसले यास ताब्यात घेवुन पुणे जिल्ह्यातील शिरुर पोलीस ठाणे हद्दीत नेऊन सोडले आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोलिस अंमलदार रोहीणी दरंदले, शिल्पा कांबळे, विशाल दळवी, संदिप पितळे, दिपक रोहोकले, तानाजी पवार, सुरज कदम, अभय कदम, शिरीष तरटे, दत्तात्रय कोतकर, राम हंडाळ, सचिन लोळगे, सोमनाथ केकाण, महेश पवार, सोमनाथ राऊत, राहुल मासाळकर, प्रतिभा नागरे यांचे पथकाने केली आहे.

# रील्स काढण्याच्या बहाण्याने ३१.७० लाखांची रोकड पळविणाऱ्या आरोपीच्या भावाला पकडले

## १६.५० लाखांची रोकड केली हस्तगत



रील्स काढण्याच्या बहाण्याने ३१.७० लाखांची रोकड पळविणाऱ्या आरोपीच्या भावाला पकडून हस्तगत केलेल्या १६.५० लाखांच्या रोकडसह एमआयडीसी पोलिसांचे पथक.

नगर – पैशांसोबत रील्स काढण्याच्या बहाण्याने मित्राची तब्बल ३१ लाख ७० हजारांची रोकड घेवून पसार झालेल्या आरोपीच्या भावाला एमआयडीसी पोलिसांनी पकडले असून त्याच्या कडून १६ लाख ५० हजारांची रोकड हस्तगत करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम घेवून पसार झालेल्या मुख्य आरोपीचा पोलिस शोध घेत आहेत. सदर घटना २४ एप्रिलला नगरमध्ये शेंडी बायपास रोडवर घडली होती.

याबाबत श्रेयश पांडुरंग लटपटे (वय २३, रा. भायगाव, ता.शेवगाव) या तरुणाने एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. फिर्यादी श्रेयश याने तो काम करत असलेल्या फर्मचे २४ एप्रिल रोजी कारंजा मालेगाव, मेहकर येथील दुकानदारांकडून रोख रकमेचे कलेक्शन केले व ३१ लाख ७० हजारांची रोकड घेवून ते नगरला येत होते. त्यावेळी त्यांना त्यांचा मित्र सुजित राजेंद्र चौधर (रा. निपाणी जळगाव, ता. पाथर्डी) याचा फोन आला. फोन वर तो म्हणाला की तुझ्याकडे असलेल्या रोकड सोबत मला रील्स काढायचा आहे.

त्यामुळे सकाळी ९ च्या सुमारास दोघे एमआयडीसी येथील सनफार्मा चौकात भेटले. तेथून ते सुजित चौधर याच्या मारुती सियाझ कार (क्र. एमएच १६ बीएच ४७९९) मध्ये बसून शेंडी बायपास रोडवर गेले. तेथे गेल्यावर आरोपी चौधर हा फिर्यादी श्रेयश ला म्हणाला की, तू समोर उभ्या असलेल्या गाडीतून कॅमेरा घेवून ये. त्यावेळी श्रेयश याने त्याच्या जवळील रोकड असलेली बॅग मारुती सियाझ कारच्या सीट वर ठेवून तो कॅमेरा आणण्यासाठी गेला. त्यावेळी त्याच वेळी आरोपी चौधर याने कार सुरु करून तो भरधाव वेगात ३१ लाख ७० हजारांची रोकड असलेली बॅग घेवून पसार झाला होता. या गुन्ह्याचा तपास करत असताना स.पो.नि. माणिक चौधरी यांना माहिती मिळाली की, या गुन्ह्यात आरोपी सुजित चौधर याचा भाऊ अक्षय उर्फ सागर राजेंद्र चौधर (वय २४, रा. निपाणी जळगाव, ता. पाथर्डी) याचाही सहभाग आहे. ही माहिती मिळाल्यावर पोलिसांनी त्याचा शोध घेत त्याला पकडले. त्याच्या कडे लुटलेल्या रोकड पैकी १६ लाख ५० हजारांची रोकड मिळून आली, ती पोलिसांनी हस्तगत केली असून मुख्य आरोपी सुजित चौधर याचा पोलिस शोध घेत आहेत.

# बनावट इंस्टाग्राम अकाउंट तयार करून तरुणीची केली बदनामी

## आरोपीविरुद्ध सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – नगर शहरातील महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या २२ वर्षीय तरुणीच्या फोटोचा वापर करून कोणीतरी अज्ञात इसमाने तिच्या नावाचे बनावट इंस्टाग्राम अकाउंट सुरू करून तिचे मित्र मैत्रिणी व नातेवाईकांना मेसेज करुन बदनामी केल्याची घटना समोर आली आहे.

या प्रकरणी अज्ञात आरोपी विरुद्ध सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत नगर शहरात राहणाऱ्या तरुणीने सायबर पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली आहे. या फिर्यादीत म्हटले आहे की फिर्यादी तरुणीच्या फोटोचा वापर करुन तिच्या नावाचे बनावट इंस्टाग्राम अकाउंट कोणीतरी अज्ञात इसमाने तयार करुन त्यावरुन तिचे नातेवाईकांना व मित्र–मैत्रिणींना मेसेज केले. त्यामुळे समाजामध्ये त्या तरुणीची व तिच्या कुटुंबीयांची बदनामी झाली.

याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात पिडित तरुणीने दिलेल्या फिर्यादीवरुन बनावट इंस्टाग्राम अकाउंट धारकाविरुद्ध बी एन एस कलम ३५६ (२) सह आय टी अँक्ट ६६ प्रमाणे गुन्हा दाखल केला अधिक तपास पोलीस निरीक्षक मोरेश्वर पेंदाम हे करीत आहे.

# कोयत्याने वार करत वृद्धाच्या खुनाचा प्रयत्न

नगर – तू आमच्या घरातील कोणाबरोबर बोलला किंवा परत आमच्याकडे आला तर तुला ठार मारेल अशी धमकी देत एकाने ६७ वर्षीय वृद्धावर ऊस कापायच्या कोयत्याने वार करुन त्यांच्या खुनाचा प्रयत्न केल्याची घटना नगर तालुक्यातील मेहेकरी येथे २६ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत झुंबरराव नाथू बडे (वय ६७, रा. मेहेकरी ता. नगर) यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे राजाराम बन्सी बडे (वय ३५, रा. मेहेकरी, ता.नगर) यास समजावून सांगण्याकरिता २६ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास त्याचे घरी गेले होते. त्यावेळी राजाराम याने त्यांच्याशी वाद घालत ऊस कापायच्या कोयत्याने त्यांच्या डाव्या गालावर, डोक्यात मारुन त्यांच्या खुनाचा प्रयत्न केला. तसेच शिवीगाळ करुन तू जर परत आमच्या घरातील कोणासोबत बोलला किंवा परत आमच्याकडे आला तर तुला जीवे ठार मारुन टाकेल अशी धमकी दिली. या मारहाणीत झुंबरराव बडे गंभीर जखमी झाले.

याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात झुंबरराव बडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राजाराम बडे यांच्याविरुद्ध बी. एन. एस.२०२३ चे कलम १०९, ३५२, ३५१ (२) (३) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक उमेश पतंगे हे करीत आहेत.

# नगरमध्ये १ मे रोजी कामगारांचा मेळावा



नगरमध्ये १ मे रोजी कामगारांचा मेळावा आयोजित करण्यात आला. त्याची माहिती देताना शिवसेना जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले. समवेत युवासेना प्रमुख योगेश गलांडे, सुरेश शिरसागर, अशोक दहिफळे.

नगर – १ मे जागतिक कामगार दिन व महाराष्ट्र दिनाच्या औचित्य साधून अहिल्यानगर मध्ये कामगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे, अशी माहिती पत्रकार परिषदेत जिल्हा शिवसेनाप्रमुख बाबूशेठ टायरवाले यांनी दिली.

नगर जिल्हा मजदूर सेना, राष्ट्रीय कर्मचारी सेना, स्वराज कामगार संघटना यांच्या वतीने व जिल्ह्यातील सर्व कामगार संघटनेच्या वतीने १ मे रोजी सकाळी ९.३० वाजता माऊली सभागृह, झोपडी कॅन्टीन जवळ, सावेडी, अहिल्यानगर या ठिकाणी आयोजित करण्यात आलेला आहे

सदर मेळाव्यास पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, आमदार काशिनाथ दाते, सहाय्यक कामगार आयुक्त रेवननाथ भिसले, अहिल्यानगर शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे व सर्व पक्षाचे पदाधिकारी, कामगार नेते यांच्या उपस्थितीत होणार आहे

सदर कार्यक्रमात कामगारांची कामातील नियमतता, कामावरील उपस्थिती व कंपनीत, सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना विशेष पुरस्कार देऊन पालकमंत्री विखे यांचे हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. सर्व कामगार बंधूंनी या मेळाव्यास उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक बाबुशेठ टायरवाले, शिवसेना युवासेना प्रमुख योगेश गलांडे, जिल्हा मजदूर सेनेचे सचिव वसंत सिंग, स्वराज कामगार संघटनेचे अध्यक्ष दत्ता तापकिरे, सुरेश शिरसागर, अशोक दहिफळे यांनी केले आहे.

# रात्रीच्या वेळी केडगाव उपनगरात संशयितरित्या फिरणाऱ्यास पकडले

नगर – रात्रीचे वेळी काहीतरी गैरकृत्य करण्याच्या उद्देशाने अंधाराचा फायदा घेवुन संशयीतरित्या आयशर टेम्पोच्या आडोशाला दबा धरुन थांबलेल्या एका तरुणाला कोतवाली पोलिसांनी पकडले. ही कारवाई नगर दौंड रोडवरील सुभद्रानगर येथे ३० एप्रिल रोजी पहाटे केली.

कोतवाली पोलिस केडगाव परिसरात गस्त घालत असताना सुभद्रानगर या ठिकाणी एका आयशर टेम्पोच्या पाठीमागील बाजुस एक इसम संशयितरित्या अंधाराचा फायदा घेवुन थांबलेला असल्याचे दिसले. पोलिसांना पाहून तो तेथुन पळुन जाऊ लागला. त्याचेवर संशय बळकावल्याने पोलिसांनी त्यास पकडले. त्यास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने उडवाउडवीचे उत्तरे देवुन काहीएक माहिती सांगितली नाही. त्याच्याकडे कसून चौकशी केली असता त्याने नाव संभाजी शिवाजी पवार, (वय २७, रा. संजयनगर, ता.गेवराई, जि. बीड) असे असल्याचे सांगितले. त्यास त्या ठिकाणी रात्रीचे वेळी येण्याचे कारण विचारले असता त्यांने उडवाउडवीची व असमाधानकारक उत्तर दिली.

या प्रकरणी पो.कॉ. रामचंद्र होले यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलीस ठाण्यात संभाजी पवार याचेविरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नगरमधील ५ कॅफेंवर छापे; ९ जणांविरुध्द गुन्हे दाखल



नगर शहरातील ५ कॅफेंवर छापे मारत पकडलेल्या कॅफे चालकांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर – कॅफेच्या नावाखाली तरूणांना अश्लील चाळे करण्यास जागा उपलब्ध करुन देणाऱ्या ५ कॅफेंवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी २९ एप्रिल रोजी एकाच दिवशी छापेमारी करत ९ जणांच्या विरुध्द शहरातील कोतवाली, तोफखाना व भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केले आहेत.

पोलीस अधिक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.दिनेश आहेर यांना नगर शहरातील कॅफेंची तपासणी करुन कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार पो.नि. आहेर यांनी २९ एप्रिल रोजी स्थानिक गुन्हे शाखेतील उपनिरीक्षक तुषार धाकराव व पोलीस अंमलदार संदीप पवार, विश्वास बेरड, पंकज व्यवहारे, शाहीद शेख, गणेश धोत्रे, विजय ठोंबरे, शिवाजी ढाकणे, आकाश काळे, जालींदर माने, मयुर गायकवाड, भाग्यश्री भिटे, सारीका दरेकर, ज्योती शिंदे यांची वेगवेगळी पथके तयार करून कारवाईच्या सुचना दिल्या होत्या. त्यानुसार पथकाने नगर कल्याण रोडवरील द परफेक्ट कॅफे, सारसनगर ते वाकोडी जाणारे रोडलगत बेलाचाव कॅफे, सावेडी गावातील पंपींग स्टेशनजवळील ऑरिगेनो कॅफे, कोहिनूर मॉलजवळील झेडके कॅफे व स्टेट बँक चौक येथील वननेस कॅफे अशा ठिकाणी छापेमारी केली. तेथे तरुण मुले, मुली अश्लील चाळे करताना आढळून आले.

पथकाने कॅफे चालक महेश पोपट खराडे (वय २३, रा.नालेगाव, (परफेक्ट कॅफे), आसिफ आयाज शेख (वय २६, रा.भोसले आखाडा, बुरूडगाव रोड), विशाल विष्णु वाघ (वय १८, रा.बुरूडगाव रोड), मंगेश भरत आजबे (वय १९, रा.बुरूडगाव रोड), महेश शंकर दरंदले (रा.चिपाडेमळा) फरार, अविनाश विलास ताठे (वय ३२, रा. ताठेनगर, सावेडी), मंगेश रमेश देठे (वय १९, रा. भगवती कोल्हार, ता.राहाता), महेश सातपुते (रा.अहिल्यानगर) फरार, कृष्णा अनिल कराळे (वय १९, रा.तपोवन रोड) यांचेविरूध्द कारवाई करुन कोतवाली, तोफखाना व भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२९, १३१ (क) प्रमाणे ५ गुन्हे दाखल केले आहेत. पथकाने या कॅफेमध्ये मिळुन आलेल्या तरुण मुला मुलींना समज देऊन सोडून देण्यात आले आहे.

# विवाहितेचा विनयभंग; तिच्या भावालाही मारहाण

नगर – विवाहित तरुणीचा पाठलाग करून तिचा विनयभंग केला तसेच जाब विचारायला गेलेल्या तिच्या भावास फायटरने मारहाण केल्याची घटना २९ एप्रिल रोजी दुपारी शहरातील चांद सुलतान हायस्कूल समोर घडली. या प्रकरणी इरफान शेख (रा.बोईसर, जि पालघर) याच्या विरुद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबत २४ वर्षीय विवाहित तरुणीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की तिच्या दोन लहान मुलांसह आई वडिलांना भेटण्याकरीता माहेरी सारसनगर येथे आली होती. त्यावेळी तिच्या सासरकडील तोंड ओळख असलेला आरोपी इरफान शेख याने तिला फोन केला व म्हणाला तुला आज मला भेटायला यावे लागेल त्यावेळी ती त्यास म्हणाली की, माझे लग्न झालेले आहे मी भेटायला येऊ शकत नाही असे म्हणाले. त्यानंतर ती तरुणी तिच्या भावासोबत २९ एप्रिल रोजी दुपारी ती कापडबाजारात खरेदी करण्यासाठी जात असताना चांद सुलतान हायस्कुल समोर आली असता इरफान शेख हा तिचा छुपा पाठलाग करत आला व तिला म्हणाला की, मला आज तुला भेटायचे आहे. त्यावेळी तिने त्यास नकार दिला. व तिने तिच्या भावास फोन करुन बोलावले व सर्व हकीगत सांगितली असता तो तात्काळ त्याचे दोन मित्रांसह त्या ठिकाणी आला. त्यावेळी इरफान शेख याने तरुणीच्या भावास पाहिले व तो पळून जायला लागला असता त्याचवेळी तिच्या भावाने व त्याचे दोन मित्रांनी त्याला पकडले. त्याच वेळी इरफान याने खिशातून फायटर काढून तिच्या भावास मारुन दुखापत केली. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी त्या तरुणीने दिलेल्या फिर्यादीवरुन इरफान शेख याचे विरुध्द भा न्या सं कलम ७५ (२) ७८ (१) ११८ (१) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.



सकल ब्राह्मण समाजसेवा संस्था व परशुराम प्रतिष्ठानच्या वतीने भगवान परशुराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त सावेडी येथील प्रकाश नेत्रालयामध्ये मोफत नेत्र तपासणी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

# सकल ब्राह्मण समाज सेवा संस्थेच्यावतीने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन

नगर – सकल ब्राह्मण समाजसेवा संस्था व परशुराम प्रतिष्ठानच्या वतीने भगवान परशुराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त सावेडी येथील प्रकाश नेत्रालयामध्ये मोफत नेत्र तपासणी, चष्म्याचा नंबर घालविणे, मोतीबिंदू, काचबिंदू तपासणी, नेत्रपटल तपासणी व नेत्र रुग्णांना मोफत औषधोपचार करण्यात आले. नेत्रतज्ञ डॉ. राजीव चिटगोपेकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ पोतदार, सचिव विजय देशपांडे, अतुल शुक्ल, श्रीया देशमुख, गौतम कुलकर्णी, कांचन तांबोळी, यशवंत आंबेकर, शैलेश देशमुख व डॉ. अमित बडवे आदी उपस्थित होते.

भगवान परशुरामांची उत्सव मूर्ती व श्रीगणेश मूर्तीस पुष्पहार अर्पण करून व दिपप्रज्वलन करून शिबिराचे उद्घाटन झाले. शिबिरामध्ये गरजू नेत्र रुग्णांची माफक दरात नेत्र शस्त्रक्रिया देखील केली जाणार आहे, अशी माहिती डॉ. राजीव चिटगोपेकर यांनी दिली.

# नगर शहरात ४ मे रोजी माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनची जिल्हा बैठक

नगर – माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशन, महाराष्ट्र राज्य या संघटनेची अहिल्यानगर जिल्हा बैठक ४ मे रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत शासकीय विश्रामगृह, नवीन जिल्हाधिकारी कार्यालय शेजारी छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर येथे जिल्हाध्यक्ष शैलेंद्र जायभाये यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. अशी माहिती संघटनेचे नगर शहराध्यक्ष वैभव कदम, प्रचारप्रमुख गणेश शेळके, सक्रिय प्रचारक इंजि.सुभाष भोर, प्रचार समन्वयक प्रमोद सुरपुरिया, सचिन एकाडे यांनी दिली आहे.

या बैठकीत संस्थापक सुभाष बसवेकर हे जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. तसेच संघटनेच्या जिल्ह्यातील सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचे संघटनेमध्ये स्वागत करणार आहे. माहिती अधिकार कायदा या चळवळीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांना काम करताना येणाऱ्या अडचणींवर देखील संस्थापक बसवेकर व शैलेंद्र जायभाये हे मार्गदर्शन करणार आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व संघटनेत नवीन काम करू इच्छिणाऱ्या माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी या बैठकीमध्ये उपस्थित राहण्याचे आवाहन वैभव कदम यांनी केले आहे.

# के. पी. अकॅडमी गुलमोहर रोड येथे जागतिक टेबल टेनिस दिन साजरा



के.पी. अकॅडमीच्या कार्यक्रमात रिदान व स्पृहा यांना स्कॉलरशीप देताना श्रीमती कल्पना भोसले, डॉ. नितिन भोसले, अॅकॅडमीच्या संचालिका सौ. निवेदिता पवार व राष्ट्रीय ब्राँझ पदक विजेते, क्रीडा व योगशिक्षक किरण पवार आदी.

नगर – के. पी. अकॅडमी, गुलमोहर रोड येथे जागतिक टेबल टेनिस दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजक खेळ घेण्यात आले. त्याच बरोबर कै. प्रा. डी. जी. भोसले कुटुंबीयांकडून रिदान सारडा व स्पृहा वैद्य यांना प्रत्येकी ६००० रुपयांची शिष्यवृत्ती व स्पोर्ट्स किट बॅग देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अकॅडमीच्या संचालिका सौ. निवेदिता पवार यांनी केले.

यावेळी बोलताना डॉ. नितीन भोसले यांनी जास्तीत जास्त मुलांनी खेळाकडे आकर्षित व्हावे व त्यांना खेळासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी सदर उपक्रम सुरू केल्याचे सांगितले. या अंतर्गत खेळाडूंना योग्य प्रशिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाईल. सदर उपक्रमाचे हे पहिलेच वर्ष असून आम्ही दर वर्षी दोन विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड करणार असल्याचे सांगितले. तसेच निवड होणाऱ्या विद्यार्थ्यांना भविष्यात खेळासाठी लागणाऱ्या साहित्यासाठी मदत करण्याचा आमचा प्रयत्न राहील असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमासाठी डॉ. नितीन भोसले, श्रीमती कल्पना भोसले व अकादमीचे खेळाडू उपस्थित होते. अकॅडमीच्या वतीने कोच किरण पवार यांनी आभार व्यक्त केले.

